वऱ्हाड समाचाराची किंमत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्षाची | आगाऊ रु० ५ | डांक हाशील | | ०१२ |
| साहामाही | " | ३ | " | ०८ |
| सालअखेर | " | ७ | " | १०८ |
| किरकोळ अंकास | | | | ०४ |

नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| १० ओळींचे आंत रु० | १ |
| पुढें दर ओळीस | ०१०६ |
| दुसरे खेपेस | ०१ |

SUBSCRIPTION
Rs.

| | | | |
|---|---|---|---|
| Annum in advance | 5 | Postage 13 | ass |
| Annum in arrears | 7 | ,,1Rs 8 | as |
| Six monthly | 3 | " 8 | as |
| Single copy | | | 4as |

# वऱ्हाडसमाचार.

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition pe line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 7 NOVEMBER 1892 NO 43

वर्ष २६ आकोला सोमवार तारीख ७ माहे नोव्हेंबर सन १८९२ इ० अंक ४३



डा० वामन गोपाळ यांचा
सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायूवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग जसे सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्य पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फाकरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुश्राव यानें झालेली क्षीणता नाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तात्काळ नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा ( मेंदु ) व मज्जातंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियाचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा
कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद काळ्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० ष्टिन ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.


## लिलाव

मेहरजी जानस्टन आणि कंपनी नं० ४
फार्बीस आणि मेडांज स्ट्रीट-फोर्ट-मुंबई
मुंबई जुडिकेचरच्या हाय कोर्टांत
साधारण अस्सल दिवाणी हुकमत
सन १८९२ च्या ६ व्या इंडियन कंपनीच्या आक्टांतील बाबदींत आणि अकोला म्यानुफ्याकचरिंग कंपनी लिमिटेड ( जी लिक्विडेशन मध्यें आहे ) तिच्या बाबदींत.
एन सी. म्याकलीआड एस्क्वायर....आफिशिअल लिक्विडेटर.

मेसर्स मेहरजी जानस्टन आणि कंपनी लिलाव करणार ह्यांज कडून ह्या लेखा अन्वयें जाहीर केलें जातें कीं, त्यांच्या लिलांव आफिसा मध्यें जाहीर लिलावानें १४ नोवेंबर सन १८९२ सोमवार रोजीं दिवसा ४॥ वाजतां अकोला म्यानिफ्याक्चरिग कंपनी लिमिटेड इच्या कर्जाची व्यवस्था लावणारे आफिशिअल लिक्विडेटर मि० एन. सी. म्याकलिआड ह्याच्या हुकुमा अन्वयें ज्या जिनगीची विक्री करण्यांत येईल ती कलमवारीनें येणे प्रमाणें:—

कलम १:—वरील कंपनीची सर्व जमीन व तिजवरील सर्व निरनिराळे जागेचे भाग आणि त्या वरील एक लहान, व एक मोठा असे दोन बंगले, इतर सर्व इमले आणि कंपोडातील बाजूचीं घरें यांज वरील सर्व हक्क, स्वामित्व, व मिळकत वगैरे मिळून सर्व वरील जमीन जुमला वऱ्हाडांतील अकोले शहरीं आहे व त्याचा विस्तार लांबी रुंदी धरून ६१७८७ चौरस यार्ड अगर या जवळ जवळ इतकेच यार्ड असून त्याची चतुःसीमा येणे प्रमाणें:— उत्तरेस–कांहीं भागाला चांदविबीची जागा व कांहीं भागाला पडीत जागा, दक्षिणेस व दक्षिण बाजूस जवळ जागा, पूर्वेस सार्वजनिक सरकारी बगीच्या कडील असलेली व त्यानें व्यापलेली जागा व पश्चिमेस मोकळी जागा. ही नमूद केलेली जमीन सन १८८६ च्या सप्टेंबरच्या २७ सावे तारखेच्या कौलपत्र्या प्रमाणें ठरवून दिलेली असून कौलपट्टा दस्तुर बेमनजी जामास्पजी सि. आय. इ. आणि बिरार आईल मिल्स कंपनी लिमिटेड या उभयतामध्यें झाला आहे.

कलम २–३० हॉर्स पॉवरचा एक डबल फ्ल्यूबायलर, २५ हॉर्स पावरचें एक इंजिन, पॅटब्रदर्सचे २८ चे, ड्रयूवुइट पेटंटचे २५ तेलाचे घाणे, एक स्क्रू कातण्याचा चरक, एक स्टीम चेस्ट, एक पाणी तावण्याचें यंत्र, एक बायलरचा डॉन्की, एक रिचवण्याचें टॅन्क, एक इंग्रजी बी स्वच्छ करण्याचें मशीन, एक इंग्रजी बी चुरण्याचें यंत्र, दोन इंग्रजी लियानें चुरळण्याचे व दळण्याचे मिल, एक ग्रायन्डिंग स्टोन, एक जॅक, इंग्रजी ड्रिलिंग मशिन, वॅरी वजन करण्याचें मशिन, फरानेचर, कातड्याचे पट्टे, कायर रोप, पुलीज, शॅफ्टींग, स्टीम पाइप्स, स्टीम पम्पस, डबल न्टस, हत्यारें व यांत्रिक सामान, स्टॉअर्स, कोळस, आणि वर निर्दिष्ट केलेल्या जागेंतील सर्व इतर वस्तू आणि इतर नक्याच्या बाबी, आणि तसेंच वरील कंपनीच्या व्यापाराच्या सवलती आणि इतर मिळकती.

या हरासाची विशेष माहिती व शेर्ती कळण्यासाठीं वर सांगितलेल्या आफिशियल लिक्विडेटरचे अटर्नी मेसर्स वाडीया आणि गांधी चर्च गेट स्ट्रीट फोर्ट बरनंबर १९ यांजकडेस, किंवा फारबीज आणि मेडोस्ट्रीट मधील खाली सही करणाऱ्यांच्या आफिसांमध्यें अर्ज करावा. तारिख २८ माहे आक्टोबर सन १८९२ इसवी.

मेहरजी जानस्टन आणि कंपनी
मुंबई आक्टोबर २०
सन १८९२

---

## उनाड मुलगा.

( मागील अंकावरून पुढें चालूं )

ही गोष्ट ज्या काळीं घडली, त्या काळीं शाळांत शिक्षा करण्याच्या तऱ्हा फार विलक्षण असत. मुलांला बांडीवर तास अर्धातास पर्यंत टांगून ठेवणें, खालून निगुडीच्या अथवा अशाच दुसऱ्या एखाद्या छडीनें सर्वांगावर वळ उठत पर्यंत मारणें, ओणव्यानें आंगठे धरावयास लावून मानेवर ब्रह्मनसा खडा ठेवणें, व तो खडा पडला कीं छडीनें फोडणें, खडें छितीत असतां मानेवर खडा ठेवणें, दोन मुलांनीं एकमेकांचे कान धरून ऊठबशा काढणें इत्यादि शिक्षांचे प्रकार पुष्कळांनीं पाहिले असतील. अशा रीतीनें शिक्षा होत असतां लोक पाहत नसत असें नाहीं तथापि त्याबद्दल कोणी कधीं तक्रार केली ऐकिवांत नाहीं. उलटें आईबापें मुलांस खूप मार देण्याबद्दल शिक्षकांस वारंवार सांगत असत. एकंदरीनें त्या वेळीं “ छडी लागे छमछम विद्या येई घमघम ” असा सर्वांचा समज होता. हें तत्व मुलांच्या मनांत उत्तम रीतीनें ठसण्याकरितां, रोज सायंकाळीं परवचा आटोपल्यावर “गण्या गण्या गणपती, चारी कमळें झळकती ” इत्यादि शब्दांनीं ह्मणत असत व त्याचे शेवटीं वरील तत्व असे. हे ‘ गण्या ’ ह्मणणें त्या काळीं अगदीं स्वाभाविक असून त्यांत ऐकणारास कांहीं एक वावगें किंवा हास्यास्पद वाटत नसे. त्याच प्रमाणें उनाड मुलांस पकडून उचल बांगडी करून शाळेंत आणणें हेंही अगदीं स्वभाविक होतें. अशा रीतीनें मुलांस शाळेंत नेतांना लोकांनीं अनेक वेळां पाहिलें असतां कोणी कधीं तक्रार केलेली नव्हती.

तथापि एखादे वेळीं मुलाला घोडीवर चढविल्यावर घोडी तुटून त्याला बरीच इजा झाली, अथवा छडी मारितांना चुकून डोळ्यास लागून डोळा फुटला, ओणव्यानें आंगठे धरितांना मुलास घेरी येऊन तो पडला आणि सावध होण्यास बराच काळ लागला, तर मात्र कधीं कधीं पंतोजीस कोणी दूषण देत असत. एखाद्याला लेंकरांचें फार वेड असलें, किंवा एकुलता एक मुलगा असला, म्हणजे त्याच्या मुलास शिक्षा झालेली त्याला आवडूं नये हें अगदीं स्वाभाविक आहे. गणूच्या आई बापांस एवढाच कायतो मुलगा. तो त्यांचा जीव कीं प्राण होता. उभयतां वृद्ध झाल्यामुळें त्यांचा सर्व भिस्त गणूवर होती. असें असतां त्याला एवढी मोठी जखम लागली कीं त्याला बरा होण्यास महिना पंधरदिवस लागतील. मग त्या वृद्ध मातापितरांस कां बरें वाईट वाटूं नये? मुलाच्या वेदना पाहून त्यांचा जीव तिळतिळ तुटे. नाना मास्तर जवळ बसले होतेच, त्यांना गणूच्या आईबापांची स्थिति माहीत होती. त्यांना फार वाईट वाटलें. एकदां तर त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले परंतु करितात काय? झाल्या गोष्टीस इलाज नाहीं.

आजपर्यंत अनेक वेळां उनाड मुलांस अशा रीतीनें शाळेंत आणिलें होतें. तसेंच गण्याला ही आणण्याचा त्यांनीं आज प्रयत्न केला परंतु आज त्यांच्या नाशीबीं लोकांकडून बोलून घ्यावयाचें होतें, तें घडून आलें.

तेथें जमलेल्या मंडळींत मोरू अण्णा ह्मणून एक समजदार गृहस्थ होता. त्यानें नाना मास्तरांचे डोळे पाण्यानें भरलेले पाहून त्यांच्या मनांत काय चाललें होतें हें तेव्हांच ताडिलें आणि त्यांचें समाधान केलें. तो ह्मणालाः–“ नाना, तुह्मी खेद मानण्याचें अगदीं कारण नाहीं. तुमचा हेतु चांगला होता. चांगलें काम करीत असतां परिणाम विपरीत झाला, तर त्यांत करणाराचा काय दोष? तुह्मांला आज येथें येऊन अगदीं नाहीं तरी १८ वर्षें होऊन गेलीं. इतक्या अवकाशांत किती मुलें हुशार होऊन संसार अंगावर घेऊन काम करीत आहेत? त्यांपैकीं किती मुलांला तुह्मी मारिलें असेल? मारून मुटकून तुह्मी त्यांस विद्यामृत पाजिलें, त्याबद्दल ते तुमचे किती ऋणी आहेत? तुमचे उपकार त्यांनीं कांहीं केलें तरी फिटतील काय?

सोनभट– ( गणूचा बाप ) खरें ह्मणतोस अण्णा, आईबाप आणि गुरू यांचे उपकार कधीं फिटायचे नाहींत. तशांत आमचा गणू तर नानांच्या गळ्यांतला ताईत. गणू वांचून नानाचें कोणतें ही काम व्हायचें नाहीं. तो रात्रंदिवस त्यांच्याच येथें असतो. नानांच्या कृपेवांचून का तो पहिल्या वर्गांत आला आहे? गणूला त्याच्या आईनें जर कांहीं काम सांगितलें, तर तो साफ करीत नाहीं ह्मणतो, पण नानांच्या घरीं पोरीला खेळवितो, जेवूं घालतो, उष्टीं देखील काढतो! नानाही त्याच्यावर तसेंच प्रेम करितात हें का आह्मांला ठाऊक नाहीं? पण होणार गोष्ट चुकत नाहीं.

त्याला नाना काय करणार? (पुढें चालेल.)

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ३ शके १८१४

अलिशान रेसिडेंट साहेबांनीं वऱ्हाडांतील हायर व लोअर परीक्षा संबंधानें नवें सरक्युलर काढिलें आहे. या सरक्युलरा वरून मागील सरक्युलरें रद्द आहेत आणि या पुढील परीक्षा नव्या नियमा प्रमाणें होत जातील. नव्या सरक्युलरांत पुष्कळ सुधारणा केल्या आहेत आणि त्या सर्व मि० क्लौडन साहेबांच्या प्रत्यक्ष अनुभवा वरून करण्यांत आल्या आहेत. हें सरक्युलर अधिकारी लोकांस चांगलें आवडेल असें नाहीं तरी त्यांत ज्या अनेक गोष्टी गोंवल्या आहेत त्यांचा समर्पक रीत्या विचार केला म्हणजे कांहीं कांहीं कडक नियमांची यथार्थता दिसून येईल.

दिवाणी, फौजदारी, मुलकी आणि हिशोबी प्रकरणांत ज्या ज्या अधिकाऱ्यांस कामें करावीं लागतात ते ते लोक त्या कामांत वाकबगारच असतात अशा गोष्टी क्वचित् घडतात. स्वाभाविकपणें मनुष्य तैलबुद्धी, व्यवहारकुशल, आणि अनुभवी असला म्हणजे त्यानें परीक्षा दिल्या नसल्या तरी तो न्यायमनसुबीचीं आणि हिशोबाचीं कामें चोख व व्यवस्थशीर करितो. परंतु बहुतेक आफिसर अशा प्रकारचे असतात असें नाहीं. चाकरी अनेक पर्यायांनीं मिळत असते. त्यांत आफिसर होणाऱ्या मनुष्याची लायकी सद्दादित कसाला लागलेली नसते आणि त्याला तर चाकरी वर रुजूं होतांच अवघड, बिकट, व भानगडीचीं कामें करणें त्याच्या दर्ज्या प्रमाणें भाग होतें. तेव्हां अशा लोकांस परीक्षेच्या मुशींत घालून ओतण्या साठीं म्हणजे कार्यक्षम करण्या साठीं या हायर व लोअर परीक्षा काढल्या आहेत. खरोखर हायर व लोअर परीक्षेंत उतरलेल्या आफिसर लोकांना ज्या कार्यमालेंत पर्यटण करावयाचें असतें तिच्या महत्वा कडे दृष्टी फेंकली म्हणजे वरील परीक्षा ही कच्ची कसोटी आहे असें आढळेल. ज्यांना कायद्यास अनुसरून न्यायाचे निवाडे करावे लागतात ते लोक कायद्यांत निष्णात पाहिजेत इतकेंच नव्हे तर कायदेपंडितांत ही त्यांची गणना अग्रस्थानीं होण्या सारखी असली पाहिजे. वऱ्हाडांत कित्येक स्थळीं न्यायाधीशापेक्षां वकील अधीक शहाणे, बहुश्रुत आणि कार्यपटु असतात आणि अशा पक्षप्रतिपक्ष करणाऱ्या लोकांपुढें हायर व लोअर झालेल्या ही आफिसरांचा कितपत निभाव लागेल हें संशयात्मक आहे. तेव्हां एकंदरीनें मि. क्लौडन साहेबांनीं हल्लीं सुधारलेलें नवें सरक्युलर काढिलें आहे त्याचा उद्देश व हेतु पाहून आम्हास संतोष वाटतो आणि नव्या नियमांची अंमलबजावणी जितक्या सक्तीनें व कडक रितीनें होईल तितकी अवश्य करण्यांत येईल असें आम्ही इच्छितों. या नव्या सरक्युलरांत जे फेरबदल झाले आहेत ते थोडक्यांत सांगून त्यांतील अपवादक गोष्टी दर्शविण्याचा आज आमचा विचार आहे.

( १ ) दरसाल हायर लोअरची परीक्षा एप्रिल व सप्टेंबर या दोन महिन्यांत होत जाईल. मध्यंतरीं वर्षांतून दोन वेळा परीक्षा घेण्याचें बंद केलें होतें तें पुन्हां सुरू झाल्यानें आफिसर लोकांची मोठी सोय झाली. ज्यांना ज्यांना ही परीक्षा देणें भाग आहे त्याना दोन वर्षांत पास होण्यास चार वेळा संधी सांपडेल आणि एका खेपेस एकेक ही विषय घेतला तरी चालण्या सारखें आहे.

( २ ) एका खेपेस एकेक विषय घेतला तरी चालेल. आणि जे हायर अगर लोअर प्रतीची वकिली पसार असतील त्यांस अनुक्रमें हायर व लोअर परीक्षा सरकारी नोकरी पतकरण्यास पास होणें जरूर नाहीं.

( ३ ) क्रिमिनल मध्यें व रेव्हेन्यु मध्यें दोन दोन कागद ठेविले आहेत आणि त्या पैकीं एका कागदाच्या उत्तरांत डेपुटी कमिशनर अथवा तहशीलदार यांस जी निवाड्याचीं कामें करावीं लागतात तसलीं कामें आक्ट व सरक्युलर पाहून करावीं लागतील.

( ४ ) मराठी भाषा ज्यांची जन्मभाषा नाहीं अशा असि० कमिशनर, अव्वाची, आणि एक्ट्रा असि० कमिशनर लोकांस मराठी भाषेंत तोंडी परीक्षा पास झालेंच पाहिजे आणि त्यांची ही परीक्षा उतरे पर्यंत विशेष कारणा वाचून त्यांना माजिस्ट्रेट वर्ग १ चे अधिकार मिळणार नाहींत. मराठी भाषेंतली परीक्षा हायर स्टांडर्डचीच आहे आणि तिला लोअर स्टाडर्ड नाहीं इतकेंच नाहीं तर लोअरची ज्यांना परीक्षा दिली पाहिजे त्यांना मराठी परीक्षा देण्याची जरूरी ही दिसत नाहीं.

( ५ ) असिस्टंट कमिशनर, अव्वाची आणि एक्स्ट्रा असि० कमिशनर लोकांस हायर संपूर्ण; तहशिलदार आणि क्लार्क आफ कोर्ट यांस लोअर संपूर्ण; आणि नायब तहशिलदार व डेपुटी क्लार्क आफ कोर्ट यांस सिव्हील पेपर खेरीज करून बाकी लोअर प्रमाणें परीक्षेंत पसार झालेंच पाहिजे. असिस्टंट कमिशनर्स वर्ग ३ यांस लोअर परीक्षेंत व मराठींत उतरे पर्यंत ४५० रुपये पगार व माजिस्ट्रेट वर्ग २ चे अधिकार मिळणार नाहींत आणि हायर व मराठी यांत उतरे पर्यंत ५०० रुपये पगार व माजिस्टेट वर्ग १ चा अधिकार मिळणार नाहीं. असिस्टंट कमिशनरा खेरीज बाकी सांगितलेले आफिसर त्यांच्या नांवा पुढें दाखविलेल्या परीक्षेंत पसार होई पर्यंत त्यांस बढती मिळणार नाहीं आणि त्यांचीं नेमणूक आक्टींग असल्यास ता कायम होणार नाहीं. वर सांगितलेल्या आफिसरा पैकीं जो कोणी ही त्याच्या नांवा पुढील परीक्षा त्याच्या नेमणुकी पासून दोन वर्षांच्या आंत उतरणार नाहीं त्यांस नोकरी वरून दुर केलें जाईल अथवा पगार कमी केला जाईल.

( ६ ) जे कोणी सरकारी नोकर नाहींत त्यांस रेसिडेंट किंवा कमिशनर यांची परवानगी मिळाल्यास हायर व लोअर परीक्षेस बसतां येईल कमिशनर अशी परवानगी देते वेळीं उमेदवाराची लायकी तो ज्या परीक्षेस बसणार असेल त्या परीक्षे वरून मिळण्या सारख्या जागेला आहे असें पाहून आणि परवानगी देण्याची कारणें लिहून ठेऊन परवानगी देतील. या प्रमाणें परवानगी मिळालेल्या मनुष्यास दरखेपेस तीन रुपये परीक्षेची फी पडेल आणि तो एका वेळीं एकाच विषया पुरता परीक्षेस बसला तरी हरकत नाहीं.

( ७ ) अभ्यास पुष्कळ वाढविले आहेत. ही सुधारणा उत्तम झाली. परीक्षा कसून घेतली तर हायर लोअरची परीक्षा वकिलीच्या तोडीची आहे असें मानण्यास हरकत नाहीं. ओथस आक्ट, स्पेसिफिक रिलीफ आक्ट, निगोशिएबल इनस्ट्रूमेंट आक्ट, ट्रान्सफर आफ प्रापर्टी आक्ट, हिंदु ला, महामडन ला, हे नवीन कायदे परीक्षे साठीं ठेवण्यांत आले आहेत.

हे वर जे सात फरक निर्दिष्ट केले आहेत त्या पैकीं कांहीं संबधानें आमचे अपवाद आहेत. वरील चौथ्या सदरांत मराठीची परीक्षा लोअरवाल्या आफिसरांनां आवश्यक केली नाहीं ही नजरचूक झाली असावी तहशीलदार वैगेरे अधिकाऱ्यांस सर्व रयतेशी संबंध ठेवावा लागतो आणि त्यांच्या कडे जबाबदारीचीं व महत्वाचीं कामें असतात. असें असून ही त्याना मराठी भाषेच्या ज्ञानाची जरूरी नसणें म्हणजे सर्व कामें सुरळीतपणें न होण्यासाठीं कृत्रिम अडथळे आणणें होय.

पांचवे सदरांत परीक्षा उतरण्यास दोनच वर्षांची मुदत ठेविली आहे ती फार थोडी आहे. ही मुदत संपतांच नापास झालेला आफिसर बडतर्फ होईल अगर कमी पगारावर बदलेल. या दोन शिक्षा विकल्पें योजल्या जातील असें सरक्युलरचा नियम सांगतो पण बडतर्फी केव्हां व कमी पगारा वर बदली केव्हां हें कोठें निर्दिष्ट नाहीं. आम्ही त्याचा अर्थ असा घेतो कीं परीक्षा आवश्यक लागणाऱ्या जाग्यावर ज्याशी बढती झाली असेल तो नापासच दोन वर्षें राहिला तर त्याची परत कमी पगाराच्या पूर्व जागीं योजना होईल; आणि ज्याचा आरंभीं नेमणूकच परीक्षा लागूं असलेल्या जागीं होईल तो आफिसर नापास राहिल्यास कामा वरून दुर होईल. या अर्थाहून इतर अर्थ सरक्युलर अंमलांत आणणाऱ्यांचा असल्यास तो फार अनिष्ट व अनर्थमूलक आहे. नायबतहशीलदार वगैरेस सिव्हिल कागद नाहीं ही सरक्युलरांत मोठी उणीव आहे. हैदराबाद कोर्ट ला प्रमाणें नायब तहशीलदारास ५० रुपये पर्यंतचे स्मालकाज कोडतांचे अधिकार दिले असतात. त्यांचे ते अधिकार काढून घेतले पाहिजेत आणि सिव्हिल मधले परीक्षेंत ते उतरे पर्यंत ते कोणास ही देता कामा नये, किंवा हैदराबादकोर्ट लाचे ११ वें कलम वृथा मानलें पाहिजे. पण या दोन तजविजो पैकीं पाहिलीच बरी दिसते.

सरकारी नोकरा शिवाय इतर स्वतंत्र गृहस्थांस परीक्षेस बसण्याची परवानगी देतां येईल अशी सोय केली हें उत्तम झालें. ज्या लोकांस सरकारी चाकरी मोठ्या दर्ज्याची मिळण्याची आशा असेल त्यांनीं हायर व लोअर परीक्षा अगोदर देऊन ठेवावी म्हणजे दोन वर्षांच्या अटीची भिती राहणार नाहीं. परंतु हा काल पावेतों पन्नास रुपये पगारा वरील सरकारी नोकरास या परीक्षांस बसतां येत असे. तसें या पुढें होऊं शकणार नाहीं. हा फेरफार चांगला झाला नाहीं. परीक्षा लागूं असलेल्या जागेवर आक्टींग नेमणूक झाल्यावर परीक्षेस बसतां येइल हें खरें पण परीक्षेची दगदग, तरतेजपणा, व तरतरी हीं वयाच्या माना प्रमाणें बदलत असतें तेव्हां एकदा विद्यार्थि स्थितीची नूर पालटली व वयानें ही मनुष्य उरत चालला म्हणजे पन्नास रुपया वरील पगारदार सरकारी चाकरांस परीक्षा लागू असलेल्या जागीं बढती मिळण्याची आशा नको. कारण यदाकदाचित त्यांची बढती झाली तर परीक्षेचें दोष त्यांची पुन्हा पिच्छेहाट करील. येणें प्रमाणें आम्ही ज्या अपवादक गोष्टी नमूद केल्या आहेत त्यांचा वरिष्ट अधिकाऱ्यांनीं नीट विचार केला असें आम्हास कळेल तर आम्हांस मोठा संतोष वाटेल.

---

राष्ट्रीय सभा यंदा अल्हाहाबादेस भरणार आहे. ही आठवी बैठक मोठी आणीबाणीची आहे. सर्व गोष्टींचा ओघ असा विलक्षण जुळून आला आहे कीं, यंदाच्या समारंभावर आपल्या गेल्या सात वर्षांच्या श्रमाचें साफल्य अवलंबून आहे. हा काल पर्यंत आपण ज्या अनेक धडामोडी केल्या, जो पैसा खर्च केला आणि जी राष्ट्रीयसभा सात वेळां भरविली त्या त्या सर्व खटपटींचें चीज करण्यासाठीं किंवा आज तागाईतचा उद्योग वृथा न जाऊं देण्यासाठीं यंदाच्या बैठकीला सर्व राष्ट्रानें एक दिलानें मदत केली पाहिजे. वायव्य प्रांताच्या लोकांनीं १८८८ सालापेक्षां टोलेजंग सभा करण्याचें योजिलें आहे. त्या वेळचे पंडित आयोध्यानाथ यंदा दृष्टीपुढें नाहींत तरी त्यांची अतुल लोकसेवा, उदार वर्तन, व राजमान्य देशाभिमान हीं लोकांच्या हृदयांत अद्याप उचंबळत आहेत. त्या त्या मनोवृत्तींनीं व स्फुर्तींनीं त्या लोकांचा दील राष्ट्रसेवेंत दंग झाला आहे. त्यांच्या तयारी वरून येत्या नाताळाचा समारंभ भव्य व अपूर्व होईल अशी आह्मांस खातरी आहे. या सालीं सर्व राष्ट्राच्या परीक्षेची वेळ आहे. मि. ह्यूम साहेब विलायतेस राहतील आणि तथून ते आपल्यास सत्कृतीचें अभिनंदन करणार आहेत. पण जे शत्रु ह्मणत असत कीं, राष्ट्रीय सभा ह्मणजे केवळ ह्यूम साहेब; ते नसले ह्मणजे ही सभा अस्तास जाईल. अशा निंदकाची वाणी खोटी करण्यां विषयीं ह्यूम साहेब बजावून गेले आहेत. त्या अर्थी या वर्षीं सर्व हिंदुस्थानांतुन प्रतिनिधी व प्रेक्षक यांचा समूह जेवढा मोठा जाइल तेवढा आपणास पाहिजे आहे.

---

The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 7 1892.

## THE ATTITUDE OF ENGLAND TOWARDS THE SILVER QUESTION.

It is possible, nay quite probable, that the Monetary Conference will break down entirely. The French and German Goverments showed themselves reluctant to hold the Conference at their Capitals viz Paris or Berlin lest they should be

deemed to have committed themselves too definitely to the Americ n views. However Brussels has consented and except London it is probably the best place to be chosen. The Americans vowed that unless they were received in London they would not send their best men. The debates at any rate will be conducted in English.

No one cau hope that bimetallism will emerge as an accomplished fact from the deliberations of this Conference. The fact that a large number of men whose intelligence can not be despised are opponents of the principle is a curious psychological fact, but need not disturb the conclusions of the scientific bimetallist. His opponents can not answer his arguments. Nor can he conclusively refute theirs. The doggedness of the monometallist remains none the less shaken. No force of public opinion can be brought to bear upon it. The public can not agitate this question as they might agitate for or against Home Rule that every man thinks he understands.

So though the bimetallists will have to fight on they fight without any present hope of victory and the practical interests of the discussions in progress at the moment wherever currency problems are dealt with has reference rather to the temporary palliatives proposed for our relief than to fundamental principles which it seems useless at present to reiterate. The closure of the Indian Mints is the only alterative to bimetallism really which is much worth talking of whether that measure be associated with a free coinage of gold at a fixed ratio and the issue of gold notes against a silver reserve, or whether it be considered as a complete step in itself, the Silver currency of our country to be kept from going too high by fresh coinage under the direction of Government if necessary. Those who recommend the closure rely upon the continuance of that state of things which may be described as the balance of trade being in favour of india. It is only by virtue of that balance that the Secretary of State would be able to sell council-bills in London at the enhanced rate to which rupees might be driven by the closure. If the Government of India had to make no payments in England the case would be all plain sailing. It would matter little how much Silver poured into the country or if it were found to be coming in too freely the closure of the mints would involve no perils. But in view of the fact that the closure is so widely advocated it may be well that we should have before us the most important contention of persons opposed to that step. They argue that the effect would be to destroy the Indian export trade. The business in wheat and tea profitable with the Rupee at 1s. 3d. would cease to be so and would come to an end with the exchange up again at 1s. 6d. The commercial world would no longer be in need of bills the Secretary of State would require to draw to meet the home charges and interst on debts and there would be no buyers. Silver meanwhile owing to the influence of the stopping of Indian Coinage would have fallen in the other Markets of the world far below even its present price and Indian finances would be at a dead stock.

This view is partly a matter of opinion. The present level of Indian export is not due to the last serious fall in silver and may be permanently compatible with a one and six penny Rupee. If the Conference fail to bring about any agreement the United States would throw silver overboard altogether and repeal the act which now provides for thee monthly purchases. What will then be the position of India? The closure of her Mints would be inevitable.

England's representatives to the Conference will not be hampered this time as at the Paris Conference by abusrd instructions constraining them to remain impervious to reason. The Daily News says that Alfred DeRothschild and Sir C Rivers are appointed to represent England, besides Sir W Houldsworth and Sir C. Freemantle of the Mint with Mr. Bertram Currie of the Glyn's Bank.

As regards the adoption of some immediate palliative in India Lord Herschell's Committee of Inguiry is almost more important than the Monetary Conference. It is to meet very soon. Nothing is yet known as to its composition even in England. General Strachey it is certain however is to be its member as well as of the Conference.

---

From the report on Criminal Justice we learn that special attention has been paid to make small and light punishments for habitual offenders as few and limited as possible. The measure of punishment as such ought to act as a preventive for further offences but when it appeared to the Resident to be of no practical avail he issued directions to punish habitual offenders with exemplary and restrictive sentences of transportation and long imprisonment. We are glad to note that there is every likelihood that habitual offenders will be duly checked with the rigorous and severe measure that is being gradually adopted. We thoroughly agree with the Resident and would like to point out that his views about the treatment of habitual offenders were a tew years back publicly discussed and the London Commissioner of Police was the advocate of severe punishments for those who disturb the peace and safety of society by their natural and inborn tendencies and cultivated inclinations of an abnormal type.

As regards sentences of fine the judges and magistrates do not seem to rightly apprehend the nature and efficiency of this punishment. The Judicial Commissioner has remarked that heavy fines exceeding the limits of means available to the offender have been imposed and have not consequently been realized in a majority of cases. The Resident observes on this point as follows:—

"The amount of fine to be imposed in any particular case requires considerable discrimination, based upon a knowledge of the circumstances of the people of the country, which can only be acquired after a long experience of and residence amongst them. The fact that so large a proportion as 12.5 per cent. of the fines imposed has been written off as irrecoverable, indicates either that the amounts imposed were excessive in a large number of cases, or that there has been laxity in the measures taken for recovery."

## वऱ्हाड

हवामान— अलिकडे थंडी थोडथोडी पडू लागली आहे. पावसाळा संपला असें आतां खातरीनें वाटतें. शेतकामें जारीनें चालू आहेत. रोगराई विशेष नाहीं.

पंचांगांत वर्तविलेल्या ग्रहलाघवा प्रमाणें गेल्या शुक्रवारीं चंद्रग्रहण ७ वाजून २१ मिनिटांनीं लागलें आणि साडे दहा वाजता सुटलें. इंग्रजी पंचागाच्या वेळा चुकल्या असें दिसतें. खग्रास ग्रहण होतें तरी पश्चिमे कडील एक बारीक कोर पांढरी दिसत होती. चंद्राचा ग्रासलेला भाग मध्यें तांबडा पण पूर्वेकडील कोरेंत काळसर असा दिसला.

मि. इलियट साहेब यांस तूर्त स्पेशल ड्युटीवर नेमिलें आणि त्यांच्या डेपुटी कमिशरचे जागी मे. कुमार श्रीहरबानजी यांस नेमलें आहे.

मि. माणिकशा रत नी दस्तूर हे खामगांव मु. कमेटीचे अध्यक्ष पुन्हा निवडले गेले.

मि. गोविंदराज मुदलियार यांची यवतमाळाहून बुलढाण्यास बदली झाली. व त्यांस बुलठाणा जिल्ह्यांतील डि० कमि० कोर्टाचे हक्क मिळाले.

मि. जे' आर. ओग्रेडी त्यांस ते घेतील त्या दिवसां पासून तीन महिन्याची रजा मिळाली.

अकोट म्युनिसिपालिटीतील सभासद के. रा. रा० कृष्णाजी महादेव यांच्या रिकाम्या झालेल्या जागेवर रा. रा. रघुनाथसिंग सितारामसिंग यांची निवड करण्यांत आली.

मि. मीर हैदरअली अव्वाची बुलढाणा यांची बदली इंदूर रेसिडेन्सींत अव्वाचीचे जागीं झाल्याचें कळतें.

सेशन खटले— गेल्या दुसरे तारखेस आकोल्याचे सेशन आटोपून मे० निकोलेट साहेब उमरावतीस गेले. या सेशनांत झालेल्या खटल्यांचा निकाल येणे प्रमाणें:— आक्टोबर १७-- (१) बुलढाणे जिल्ह्यांतील तुळशीराम सोनारावर रात्रीस घरफोडी केल्या बदल काळेपाण्याची सजा. (२) बुलढाण्या कडील खंडू वंजारी दरवडा घातल्याच्या आरोपांतून सुटला. आक्टो १८, (३) अकोला जिल्ह्यांतील सिताराम वलद मोहन सहा वेळां पूर्वी सजा मिळून घरफोडींत सांपडल्या वरून काळे पाण्यावर धाडला गेला. (४) अकोलें जिल्ह्यांतील रुपिया वलद महादेव यांस चोरी बदल १८ महिन्यांची सजा व २० फटके सुनावले. आक्टोबर २१-२४ अखेर वाशिम जिल्ह्यांतील (५) बंक्या आणि पांचजण व (६) मारोती व हंसाजी अशा आठ इसमाची खून नव्हे अशा सदोष मनुष्यवधा बद्दल चौकशी झाली. आक्टो. २५ पासून २ नोवेंम्बर पर्यंत अकोल्या जिल्ह्यांतील पांच खटल्यांचा निकाल झाला त्यांत (७) शमसुद्दीन मनुष्यवधाच्या दोषांतून सुटला; (८) लक्ष्मण उर्फ किसन यास घरफोडी बदल काळेपाण्यावर धाडलें; (९) जानजी वलद रुपाजी खुनाच्या आरोपांतून सुटला; (१०) द्वारका वलद महिपाल आणि ९ इसम हे घातुक दरवड्याच्या मोकद्दम्यांतून सुटले; आणि (११) तांदळीचा टिकाराम पाटील खुनाचा पुरावा नाहींसा केल्याच्या अपराधांतून सुटला

मि० एकनाथ मोरेश्वर तहसिलदार, दारव्हा यांस ते घेतील त्या दिवसापासून तीन महिन्यांची रजा मिळाली; व त्यांचे जागीं नायब तहसिलदार रा० विनायक अप्पाजी यांस नेमिलें आहे

येथील व्यापारी पेठ्यांत सव्याचे भाव न तुटल्यामुळें सव्याचा व्यापार फार मंदींत होता. सव्याच्या भावाचें व करारमदाराचें प्रकरण आपसांत मिटेना ह्मणून कोडतांत चालणार होतें. कोडतांत हजर असतांनाच उभय पक्षांचा सलोखा होऊन गेल्या शुक्रवारीं गुदस्त सालच्या सव्याचे भाव तोडण्यांत आले ते येणें प्रमाणें:— गहूं—७१ रु०; रुई बोजा-५०।. रु०, आळशी ८५, व सरकी—५१-॥

जुडीशिअल कमिशनरचे इंग्लिश आफिसांतील ६० रुपये पगाराचे कारकून रा. रा. गणेश वासुदेव निमकर यांस यवतमाळास आफि० डेपुटी क्लार्क नेमलें. आणि त्यांचमा जागीं मि. टेलर यांस नेमलें.

रा. रा. बळीराम राघव यांनीं यवतमाळास वाकिली चालू करून आपल्या जुडि० कमिशनर कचेरींतील ४० रुपये पगाराच्या जागेचा राजिनामा दिला.

लेफटेनंट डब्ल्यू हडसन पोलिटिकल असिस्टंट वर्ग ३ यांची नोकरी वऱ्हाड कमिशन मधून काढून परत लष्करी खात्यांत दाखल केली आणि त्यांच्या जागीं क्याप्टन फागन हे रजेवरून परत आल्या नंतर रुजू होतील असें ठरलें आहे.

गेल्या शुद्ध द्वादशीस येथील शेट बनसीलाल फकीरचंद यांनीं तुळसीविवाह मोठ्या थाटानें केला. शेटजीच्या घरची तुळस व लक्ष्मीनारायणाचे मंदिरांतील श्रीदामोदरमूर्ति हीं वधूवरें होतीं. सर्व विवाहसमारंभ माणसांतील विवाहा प्रमाणें सालंकृत कन्यादानाचा यथासांग झाला. अक्षत, वरात, ब्राह्मण भोजनें, चिराकदान, नाच, बेंडबाजा वगैरे सर्व मंगल गोष्टी करण्यांत झाल्या. धर्मीच्या ठायीं ही श्रद्धा पाहून मनाला संतोष होतो पण वस्तुमान प्रमाणें धर्मबुद्धि योग्य व आवश्यक गोष्टीकडे वळविणारा कोणी शास्ता मिळेल तर बरें.

वाशिमकर मंडळीनें परवा रात्रीं साग्र रामराज्य वियोगाचा प्रयोग केला. नाटक लोकांस फार आवडलें.

---

नोटीस

तुकाराम वलद रामचंद्र राऊत मौजे बटवाडी खुर्द ता० बाळापूर यांसः—

अहिलाई जवजे असाजी राउत पाटील मौजे बटवाडी खुर्द ता० बाळापूर इजकडून नोटीस—मौजे बटवाडी येथील शेत सर्वे नंबर ९८ पैकीं, यांत आमची मिरासी आंब्यांचीं झाडें ६ आहेत त्यांत वहिताचा बार निम्मे जाऊन मिरासीच्या निम्मे हिश्यांत तिसरा हिस्सा माझा होता तो मी पूर्वी फकीरा वलद प्रियमजी यांस नवऱ्याचे कर्जा करितां ७५ रुपयांस विकला असून त्यांचेच ५० रुपये मी देतों, मला फरोक्त खत करून दे असें सांगून खत करून घेतलें आहेस. ह्यास दोन वर्षें झालीं तरी त्याचे रुपये अजून मला दिले नाहींस आणि झाडाचें उत्पन्नाविषयीं भांडत आहेस ह्या करितां नोटीशीनें कळवितें कीं, आतां तुझे रुपये मला नकोत. दस्तऐवज पोकळ जो तुजपाशीं राहिला आहे तो मी रद्द केला आहे. तो मला परत दे. ता. ५ माहे नोवेंबर १८९२इ०

(सही.) अहिलाई जवजे असाजी
राऊत इच्या हातची
निशाणी बांगडी.

---

## वर्तमानसार

हिंदुस्थानच्या लोकांस वरच्या प्रतीचें शिक्षण दिल्यास ते शिरजोर होतील व आपणास वाकवून देण्यास तयार होतील असे जें कित्येक इंग्रजांचें ह्मणणें आहे तें चुकीचें असून ते शिक्षण देण्याचे बंद केल्यास मात्र १८५७ सारखा प्रसंग येण्याची भीति आहे असें प्रोफि० वाग्वरींचें ह्मणणें आहे.

गेल्या अतिवृष्टीनें सदर्न मराठा रेल्वेच्या आजूबाजूची शेतें अगदीं वाहून जाऊन त्या ठिकाणीं शेतें होती किंवा नव्हती असें झालें आहे असें सांगतात. हा पाऊस घाटावरच्या दुसऱ्या पिकास फार उपयोगी पडण्यासारखा होता, आणि तो बेतानें पडला असता तर तसा उपयोग होऊन गहूं, हरबरा व जोंधळा यांचें पीकही फार मोठें आलें असतें, पण तो फाजील पडल्यानें पीक चांगलें होण्याच्या बदली अनीच वाहून गेलें आहे; आणि अजूनही पावसाचा जोर कमी होत नसल्यामुळें आणखी काय काय प्रकार होणार हें कांहींच समजत नाहींसें झालें आहे. नद्या नाले यांस सारखा पूर चालला असून खडक वासल्यासारखी, जी कित्येक तळीं क्वचितच भरावयाची तीं आज भरून वहून चाललीं आहेत; आणि अजून ही पाऊस पडतच आहे. तेव्हां नवीन पिकण्याची काळजी लागून पिकलेलें पदरांत पडण्याचीही काळजी लागली आहे कोंकणांत पुष्कळ ठिकाणची हळवार शेतें या पावसानें झोडपून काढल्यामुळें त्यांचा निम दाणाही हातीं लागण्याची आशा दिसत नाहींशी झाली आहे आणि उशिरानें पिकणारीं जीं आतां तयार झालीं आहेत तीं तरी कापून साठविण्याची संधी मिळेल कीं नाहीं याची भीति वाटत आहे ईश्वराची काय इच्छा असेल ती खरी.

निझाम हैदराबादेस मेहदी हसनच्या फिर्यादीवरून अब्रू घेतल्याचा जो एक बीभत्स खटला चालू आहे त्यांत आरोपी तर्फेच्या लखनौ येथील साक्षीदारांच्या जबान्या झाल्या असें २७ ची तार सांगते व त्यांत अधिकच गमती बाहेर येत आहेत. बहुतेक साक्षीनीं दोन्ही पक्षास कमी जास्त अनुकूळ असाच मजकूर सांगितला असून ते बहुतेक साक्षीदार विश्वसनीय असतां आरोपीतान्या वकिलास ज्या गोष्टी लिहून दिल्या त्यांच्या विरुद्ध गोष्टी लिहून दिल्या, त्यांच्या विरुद्ध गोष्टी प्रतिज्ञेवर सांगितल्या आणि मला ३००, मला ४००, मला ५००, असें रुपये देवूं केले ह्मणून त्या वकिलास तशा जबान्या दिल्या, पण आपणास त्या रकमा पोचल्या नाहींत असले प्रकार त्यांणीं आपल्या जबान्यांत सांगितले आहेत!!

पुण्याची पांचवी प्रांतिकसभा समेचे सेक्रेटरी कळवितात कीं, यंदाच्या सालची प्रांतिकसभा येत्या नवंबर ता. ७।८ सोमवार व मंगळवार रोजीं भरविण्याचे ठरविलें आहे. सभेचें अध्यक्षस्थान कलकत्याचे अध्यक्ष आ० फेरोजशाहा मेथा मुंबईचे प्रसिद्ध ब्यारिष्टर यांनीं स्वीकारण्याचें कबूल केलें आहे.

कायदे कौंसिलचे नियमाखेरीज प्रांतिक सभेंत यंदा ज्या विषयांचा विचार करण्याचें सध्या ठरलें आहे त्यांतील पहिला सर्वत्र पसार झाला पाहिजे तो असाः—

१ मोठ्या पगाराच्या जागा नेटिवांस देण्याबद्दल मुकेच जे नियम प्रसिद्ध झाले आहेत ते पब्लिक सर्व्हिस कमिशनें केलेल्या सूचना इतकेही सढळ नाहींत व एकंदरींत या ठरावापासून पूर्वीं जितक्या जागा नेटिव्हांस मिळत होत्या तितक्याही या ठरावापासून मिळणें कठीण आहे करितां या ठरावांत सरकारानें योग्य फेरफार करावे अशी सरकारास विनंता करणें.

निझामाच्या हद्दींतही पर्वीचा पाऊस रकडून पडला व एकंदर ४२ इंच झाला तिकडच्या दुसऱ्या पिकास हा पाऊस फार उपयोगी होईल.

मुंबईसरकारच्या ताब्यांतली जी नेटिव संस्थानें आहेत त्यांत वकिली करूं इच्छिणाऱ्या उमेदवारांची परिक्षा येत्या फेब्रुवारीच्या २७व्या तारखेस होणार आहे. परिक्षेची जागा अजून कायम होणें आहे.

सोलापूर, खानदेश, वगैरे जिल्ह्यांतील कित्येक गांवांस नवी जमाबंदी लागू केल्याचे सरकारी ठराव गेल्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाले असून ते कायम राहण्याच्या मुदतीही कमी जास्त अशा ठरविण्यांत आल्या आहेत.

तेहेरान येथून इस्पहान व मिराज येथें ही पटकीचा वारवा सुरू झाला आहे.

मद्रासरसरकार बापकर इन्स्पेक्शन अक्ट करीत आहे.

होम सेक्रेटरी मेहदी अली यांस सस्पींड केल्यामुळें हायकोर्ट जज्ज नबाब इमदजंग यांस निझाम सरकारानें हल्ली होम सेक्रटरी नेमलें आहे.

विलायतची पार्लमेंटसभा येत्या जानेवारीच्या १५ तारखेच्या सुमारास पुन्हां सुरू होईल असें सांगतात.

येत्यावर्षीं रशियाच्या लश्करांत २,६२,५००० लोकांची नवीन भरती व्हावयाची आहे व त्या शिवाय कोकेशन फौजेत २४०० लोक भरावयाचे आहेत.

रशियाच्या राज्यांत कियेक ठिकाणीं अजून पटकी चालूच आहे.

लांकशायर येथील गिरण्यांतले ५०,००० मजूर लवकरच काम सोडून कट करून एकीकडे होणार आहेत असें सांगतात.

चित्रळचा नवा राजा ह्मणजे हेतर अफझुल उल्मुलक याच्या मनांत इंग्रजसरकारचा ताबेदार व्हावें असें फार आहे व त्याणें त्याकरतां मोठ्या आग्रहानें हिंदुस्थान सरकारास कळविलें कीं तुमचा एक कामदार माझ्या राज्यांत पाठवून द्या व त्याप्रमाणें डा राबर्टसन हे लवकरच गिलीजीत येथून चित्रळ येथें जातील. ठा० अ०

कलकत्ता येथें एकानें चार आण्याचा स्टांप एक पैसा वर घेऊन विकला ह्मणून त्याजवर खटला होऊन त्यास ५० रुपये दंड झाला. लेसन दारांनीं सावध रहावें.

निजाम सरकारनें आपल्या संस्थानच्या हद्दीबाहेरच्या गरीब मुसलमान विद्यार्थ्यांस कालेजांतून विद्या शिकण्याचें उत्तेजन देण्याकरितां दरसाल ४२०० रुपये खर्च करण्याचा ठराव केला असून त्यापैकीं ६०० रुपये मुंबई इलाख्यांत इसलाम सभेमार्फत खर्च व्हावयाचे आहेत.

रंगून येथें एक युनिव्हर्सिटी स्थापन करण्याची सूचना पुढें आली आहे.

सु० प्र०

**दक्षिणेतील सरदार** — सन १८९२ सालाची दक्षिणेतील सरदार, सरदारांच्या विधवा, आणि आनररी सरदार यांची यादी मागील आठवड्याच्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाली आहे तींत पहिल्या वर्गाचे ६१ व दुसऱ्या वर्गाचे ८५ आणि तिसरे वर्गाचे ?१ सरदार वगैरे आहेत.

बर्फांत किडे!- असें सांगतात कीं, अमेरिकन डाक्टरानी पीतज्वर किंवा कावीळ यांचे उत्पादक जे सूक्ष्म जंतु ते बर्फांत आढळलेले आहेत हें जर खरें असेल तर यापुढें बर्फ तापवून व कढत करून मग खावा. हें असें केल्यानें त्यांतले पीतज्वरोत्पादक व कामिनी रोगजनक जंतू मरून जाऊन बर्फ भक्षणापासून कांहीं रोगोत्पत्ति होण्याची भिति राहणार नाहीं.

सरकारानें असा कायदा केला आहे कीं ज्याची हिंदुस्थानात लोअर स्टंडर्डची परिक्षा पास झाली आहे त्यास एडिक्यांपची जागा मिळावी.

पोस्ट कार्डाला पृथ्वी प्रदक्षणा करण्यास १७ दिवस लागतात. न्या० सिं०

फोटोग्राफची जलदी.—फोटोग्राफ काढण्याच्या कलेंत जलदीच्या मानानें आलीकडे इतकी विलक्षण सुधारणा झाली आहे कीं, ज्या बंदुकातली गोळी दर सेकंडास ३,०००फूट लांब जाते तिचाही फोटोग्राफ तावडतोबीनें व अगदीं बरोबर घेतां येतो! ज्ञा० च०

---

## जाहिरात

कां फसतां? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विकीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्त्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्ह्यल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचे व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ चातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारें हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारें, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १८५ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ८।४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे वेडे वटसी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर ३ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।=

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शूळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं न सून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जल्द गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धशिशी यांजवर दर डबीस किं. १८=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारल्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व सांधे दुखणें यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस किं. १८–

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ॥। हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सून व मुखरोग ६५ व सान्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. ही ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फुल वडस रातांधळे लाली खुपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस किं. १८६

ह्या शिवाय पोष्टेज निराळा पडेल.

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेशा मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर
वैद्य कुरणखेडकर अकोला गंगावरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
साहामाही ,, ३ ,, ०।८
साळअखेर ,, ७ ,, १।८
किरकोळ अंकास ..........................०४

नोटिसीबद्दल.
१० ओळींचे आत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०।१

Annum in advance 5 Postage 13 ass
Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly...........3 " 8 as
Single copy..................................4as

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetitio pe lin3a


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXVI AKOLA MONDAY 14 NOVEMBER 1892 NO 44

वर्ष २६ आकोला सोमवार तारीख १४ माह नोवेंबर सन १८९२ इ० अंक ४४



डा० वामन गोपाळ यांचा

सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह पासून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधि त वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग जसे सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज मळवे व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र धाकरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुस्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तात्काळ नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदू) व मज्जातंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुंचा शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्यांचे एका बाटलीस १४ आणे बंमी व पोष्ट मिळून एका पासून तिती ही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा

कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला म्हणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० डिन ४ आणे.

वरील सर्व औषधांच्य विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्हि. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.


## लिलाव

मेहरजी जानस्टन आणि कंपनी नं० ४ फार्बीस आणि मेडोन स्ट्रीट-फोर्ट-मुंबई मुंबई जुडिकेचरच्या हाय कोर्टांत साधारण अस्सल दिवाणी हुकमत सन १८९२ च्या ६व्या इंडियन कंपनीच्या आकटांतील बाबदींत आणि आकोला म्यानुफ्याकचरिंग कंपनी लिमिटेड (जी लिक्विडेशन मध्यें आहे) तिच्या बाबतींत. एन. सी. म्याकलीआड एस्क्वायर....आफिशिअल लिक्विडेटर.

मेसर्स मेहरजी जानस्टन आणि कंपनी लिलाव करणार यांज कडून या लेखा अन्वयें जाहीर केलें जातें कीं, त्यांच्या लिलांव आफिसा मध्यें जाहीर लिलावानें १४ नोवेंबर सन १८९२ सोमवार रोजीं दिवसा ४॥ वाजतां अकोला म्यानिफ्याक्चरिंग कंपनी लिमिटेड इच्या कर्जाची व्यवस्था लावणारे आफिशिअल लिक्विडेटर मे० एन. सी. म्याकलीआड ह्याच्या हुकुमा अन्वयें ज्या जिनगीची विक्री करण्यांत येईल ती कलमवारीनें येणे प्रमाणें:—

कलम १:—वरील कंपनीची सर्व जमीन व तिजवरील सर्व निरनिराळे जागेचे भाग आणि त्या वरील एक लहान, व एक मोठा असे दोन बंगले, इतर सर्व इमले आणि कंपौंडांतील बाजूचीं घरें यांज वरील सर्व हक्क, स्वामित्व, व मिळकत वगैरे मिळून सर्व वरील जमीन जुपला वऱ्हाडांतील अकोलें शहरीं आहे व त्याचा विस्तार लांबी रुंदी धरून ६१७८७ चौरस यार्ड अगर या जवळ जवळ इतकेच यार्ड असून त्याची चतुःसीमा येणे प्रमाणें:— उत्तरेस—कांहीं भागाला चांदबिबीची जागा व कांहीं भागाला पडीत जागा, दक्षिणेस व दक्षिण बाजूस बखळ जागा, पूर्वेस सार्वजनिक सरकारी बगीच्या कडील असलेली व त्यानें व्यापलेली जागा व पश्चिमेस मोकळी जागा. ही नमूद केलेली जमीन सन १८८६ च्या सप्टेंबरच्या २७ सावे तारखेच्या कौलपत्त्या प्रमाणें ठरवून दिलेली असून कौलपट्टा दस्तुर वेमनजी जामास्पजी सी. आय. इ. आणि बिरार अईल मिल्स कंपनी लिमिटेड या उभयतामध्यें झाला आहे.

कलम २–३० हॉर्स पॉवरचा एक डबल फ्ल्यूबायलर, २६ हॉर्स पावरचें एक इंजिन, पॅटर्नदर्सचे २८ चे, ड्रयूवुइट पेटंटचे २९ तलाचे घाणे, एक स्क्रू कातण्याचा चरक, एक स्टीम चेस्ट, एक पाणी तावण्याचें यंत्र, एक बायलरचा हॉन्की, एक रिचवण्याचें टॅन्क, एक इंग्रजी बी स्वच्छ करण्याचें मशीन, एक इंग्रजी बी चुरण्याचें यंत्र, दोन इंग्रजी लिथार्ज चुरळण्याचे व दळण्याचे मिल, एक ग्रायन्डिंग स्टोन, एक जॅक, इंग्रजी ड्रिलिंग मशिन, लॉरी वजन करण्याचें मशिन, फरनेघर, कातड्याचे पट्टे, कापर रोप, पुळीज' शॅफ्टींग, स्टीम पाइप्स, स्टीम पम्पस, डंड, न्टस, हत्यारें व यांत्रिक सामान, स्टोअर्स, कोळसे, आणि वर निर्दिष्ट केलेल्या जागेंतील सर्व इतर वस्तू आणि इतर नफ्याच्या बाबी, आणि तसेंच वरील कंपनीच्या व्यापाराच्या सवलती आणि इतर मिळकती.

या हरासाची विशेष माहिती व शेर्ती कळण्यासाठीं वर सांगितलेल्या आफिशियल लिक्विडेटरचे अटर्नी मेसर्स वाडीया आणि गांधी चर्च गेट स्ट्रीट फोर्ट धरंनबर १९ यांजकडेस, किंवा फारबीज आणि मेडोस्ट्रीट मधील खाली सही करणाऱ्यांच्या आफिसांमध्यें अर्ज करावा. तारिख २८ माहे आक्टोबर सन १८९२ इसवी.

मेहरजी जानस्टन आणि कंपनी
मुंबई आक्टोबर २०
सन १८९२

---

डि. कि. क्लास १३ मिसल नं. १/१८९२

वि० डि० जज्ज साहेब बहादूर जिल्हे अकोलें.

अज्ञानाचें पालन करण्या बद्दल सरटीफिकीट मिळण्याविषयीं अर्ज सन १८९० चा आक्ट ८ कलम १० प्रमाणें.

अर्जदार हरी वल्लद नारायण वैश्य सोनार राहणार पेठ खामगांव ता० मजकूर जिल्हे अकोलें अर्ज करितों असा कीं:—

१ भिकू वा॥ मुकुंदा जात वैश्य सोनार उमर वर्ष ६ राहणार खामगांव हा अर्जदार याचा साक्षात मुलगा असून अर्जदार याचा धाकटा भाऊ नामें मुकुंदा यांस सुमारें ५ वर्षें झालीं दत्तक दिला आहे. अज्ञानाची कांहीं स्वतःची मिळकत नाहीं. अज्ञान हा हल्लीं अर्जदार याजपाशीं खामगांव येथें राहत असून अर्जदार हाच त्याचे पालनपोषण करित आहे.

२ अज्ञान भिकू याचा अर्जदार हा प्रत्यक्ष बाप असून त्याची प्रत्यक्ष आई नामें पुतळी मर्द हरी व अज्ञानाची दत्तक आई नामें राधाबाई मुकुंदा मैत व अज्ञानाचा वडील भाऊ नामें माधो वा॥ हरी उमर-वर्षे १६ असें चौघे अज्ञानाचे जवळचे नातलग असून सर्व खामगांव येथें राहत आहेत.

३ सदरहू अज्ञानाचें पालन करणारा नेमण्या विषयीं आज पावेतों कोणीही कोणतेंच प्रकरणांत अर्ज वगैरे दिला नाहीं. अज्ञानाची अगर त्याचे मिळकतीची अद्याप कोणी पालन करणारा नेमला गेला नाहीं. अज्ञानाची स्वतःची कांहीं जिनगी नसल्यामुळें केवळ अज्ञानाचें पालन करण्यास जो पात्र असेल त्यास अज्ञानाचा पालन करणारा नेमला जावा. असें बद्दल अर्ज आहे.

४ अर्जदार हा वर लिहिलें प्रमाणें अज्ञानाचा साक्षात बाप असून अज्ञानाचा मैत दत्तक बाप मुकुंदा हा अर्जदाराचा साक्षात बंधु असून समाईक असतां मरण पावला. घराण्याचा अर्जदार हा वडील असून कर्ता आहे. व अज्ञानाचें हल्लीं पालन पोषण हो तोच करीत आहे.

५ अज्ञानाची दत्तक आई नामें राधाबाई मर्द मुकुंदा हिणें अज्ञानाचे अंगावरील डागिने जे हल्लीं अर्जदार याचे ताब्यांत आहेत. व जे समायीक मिळकती पैकीं आहेत ते मागण्या विषयीं तिनें खामगांव येथील स्मालकाज कोर्टांत दि. मु. नं. ५१३/९२ चा दावा आणिला आहे. वरून हा अर्ज केला आहे. रोषन होय. ता. १८–१०–९२ इ॥

(सही)
हरी नारायण सोनार राहणार खामगांव द. खु.

मी अर्जदार अशी प्रतिज्ञा करितों कीं, वरील अर्जांत लिहिला मजकूर माझे माहितीप्रमाणें व समजुती प्रमाणें खरा आहे ता॥ मजकूर.

हरी नारायण सोनार द. खु.

---

## नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना.

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचे सरटीफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचे पालन व त्याचे माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्याविषयीं.

सन १८९० चा आक्ट ८ कलम १० प्रमाणें.

अर्जीचा नंबर. क्लास १३ मिसल नं. १/१८९२

वि० स्पे० अ० कमिशनर साहेब जिल्हे अकोलें यांचे कोर्टांत.

अर्जदार हरी बापाचें नांव नारायण जात सोनार राहणार खामगांव.

(अज्ञान) भिकू बल्द मुकुंदा जात सोनार राहणार खामगांव तालुके अकोला जिल्हे अकोला. याचे पालन व माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमला जावा. म्हणून अर्ज दिला आहे. यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा बक्षीसपत्रावरून किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहु अज्ञानाचे माल मिळकतीवर संभाळ कर्ता या नात्यानें कबजा करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं, याणी ता. २ माहे दिसेंबर सन १८९२ इ० रोजीं वरील अर्जीची चौकशी होणार आहे. तेवेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकीकत दाखल करावी. तारीख ७

माहे नवंबर सन १८९२ इ.
V. N. Dandekar.
( शिक्का ) सिविल ज्यडूज्य.

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ९ शके १८१४

आह्मास लिहिण्यास मोठा आनंद वाटतो कीं व्हाइसराय लार्ड लान्सडाऊन हैद्राबादेस गेल्यामुळें निजाम सरकार व हिंदुस्थान सरकार यांच्या मधील परस्पर प्रेमभाव दुणावला आणि हैद्राबादेस लाटसाहेबा प्रीत्यर्थ जे आनंदोत्सव व पाहुणचार झाले त्यांतील एका प्रसंगीं आगतस्वागतपर भाषणें चाललीं असतांना व्हाइसराय साहेबांनीं अत्यंत कल्याणप्रद, उदार मनाचे, आणि दृढ स्नेहभावाचे आनंदोद्गार काढले. व्हाइसराय बोलले कीं ज्या निजामांच्या राष्ट्राचा विस्तार एक लक्ष चौरस मैल असून एक कोट दहा लक्षानजीक प्रजा आहे अशा मोठ्या संस्थानाची राजनिष्ठा व निजाम सरकारची कारकीर्द हीं पाहून मोठा संतोष वाटतो. यापुढें निजामांची अनुकूल राजव्यवस्था व वर्णनीय सुधारणा लोक दृष्टीस येतील. संस्थानाची धनाढ्यता हेंच उत्तम सुव्यवस्थेचें फळ होय असा बोध सांगून व्हाइसरायांनीं निजामा विषयीं अभिमान दर्शविला की सन १८८७ त सरहद्दीच्या प्रकरणांत निजामांनीं साठ लक्षाची देणगी देऊन इतर संस्थानिकांस कित्ता घालून दिला इतकेंच ना हीं तर सध्यां ही आपण होऊन निजामांनीं एक घोडेस्वार पलटण जाद्दा महाराणी सरकारच्या तैनातीस दिली आहे. सर्व फौज ३०००० असून सालिना ७१ लक्ष रुपये खर्च निजाम करितात ही गोष्ट त्यांनीं विशेष वाखाणली. सर फिट्झपाट्रीक यांचे वर्णनीय गूण दाखवून व्हाइसराय अखेरीस ह्मणाले कीं मि. क्रीडन साहेब मोठे मुत्सद्दी, राज्यकारभारांत निष्णात, आणि निजामाचे विश्वासू कौन्सिलदार आहेत. व्हाइसराय साहेब गेल्या मंगळवारी पुढें ह्मसूरकडे रवाना झाले.

---

वऱ्हाड शिक्षक समाज बुधवार पासून चार दिवस भरला होता. सर्व प्रांतांतील विद्वान लोक एकत्र जमून त्यांनीं शाळा खात्यांतील उणिवी संबंधानें व नव्या सुधारणा संबंधानें विचारपूर्वक खल करून अनेक सूचना केल्या आहेत त्या सर्व एकदम विस्तारा शिवाय स्पष्ट होण्या सारख्या नाहींत ह्मणून ते काम आह्मी या अंकीं करूं शकत नाहीं. डायरेक्टर साहेबांनीं सांगितल्या प्रमाणें बाह्य देखाव्याच्या गोष्टी न होतां सर्व खऱ्या उपयोगाच्या व फायद्याच्या गोष्टी करण्यांत आल्या. समाजाचे ठराव व काम पाहून रावबहादूर जठार खुष झाले. समाजाच्या मंडळींस रजा देते वेळीं त्यांनीं जमलेल्या मंडळीचे आभार मानून सुश्राव्य, सुबोध, व सुरेख व्याख्यान दिलें. मोर्शी, मेहेकर, केळापूर व वणी या तालुक्याकडील शिक्षक आले नाहींत पण ते न येण्यास कारणें गेल्या पावसामुळें झालेले खराब रस्ते, नद्यानाल्यांचे पूर वगैरे असावींत असें दर्शवून पुसद, नेर, दारव्हे वगैरे लांबच्या लांबून आलेल्या लोकांचे त्यांनी विशेष आभार मानले त्यांनीं वर्ग शिकवून दाखविले व निबंध वाचले त्या लोकांचीं नांवें सांगून त्यांनीं त्यांची प्रशंसा केली. आणि रा. रा. काळे वकील व डाक्टर खांत यांनीं उमरावतीहून येऊन सुरस व्याख्यानें दिलीं यासाठीं रावबहादुरांनीं मोठी तारीफ व वाखाणणी केली. कांहीं समाजाच्या सूचनावर राव बहादूर ह्मणाले कीं, मुलांच्या आईबापांशीं दळणवळण वाढविण्याचा प्रयत्न करण्याचा हामडेल घालण्यापेक्षां आपल्या स्वतांच्या मुलाप्रमाणें शिक्षकांनीं कळकळीनें शिकवावें ह्मणजे आईबाप शिक्षकाकडे धावून येतील. गांवठी मास्तरांस ४ इयत्तेवर अट ठेवणें बरोबर नाहीं आणि त्याच प्रमाणें ट्रेनिंगाच्या अभ्यासाचीं बुकें वाढविणें ही जरूर दिसत नाहीं असें दर्शवून शेवटी रावबहादुरांनीं उत्तम प्रकारें बोध केला कीं धर्मबुद्धि व पापभीरूपण', नामुन ठेऊन शुद्धाचरण ठेवणें ही एक अमूल्य गोष्ट आहे आणि शिक्षकांच्या तर शुद्धाचरणाची अत्यंत जरूरी आहे कारण कीं त्यांच्या वर्तनाच्या अनुकरणानें बहुतेक विद्यार्थी बरं वाईट निवणार असतात.

---

The fifth Provincial Conference of the Bombay Presidency passed off successfully having held its sittings for two days in the Hirabag Town Hall at Poona on the 7th. and the 8th. of this month. It was presided over by Mr. P. M. Metha a distinguished and renowned barrister of the Bombay Bar and who is as all know a staunch and firm Congresswalla. From a long time since his unanimous selection to that responsible post it was anticipated that the work of the Conference would be a conspicuous and grand success and would at the same time be charactrized by that enthusiasm and liveliness unnoticed in the previous Conferences. We are glad to read that that expectation has proved true to the letter. As he entered the Hall he was greeted with lond cheering by an enthusiastic mass of delegates and visitors who had come there from the most distant parts of the presidency to attend the Conference. It is truly gratifying to learn that his presence in the Hall was at once the token, the symbol that the porceedings of the Conference would be gone through orderly, methodically and energetically.

Mr. Kashinath Pant Natu a well known pleader of the Poona bar tendered to the delegates assembled, a cordial, sincere, and earnest welcome on behalf of the Reception Committee and invited them to proceed to elect their President—a process to be gone through formally. After the election of the President, Mr. P. M. Metha delivered his presidential address which was worthy in every way of the gentle—man from whom it proceeded. At the very outset is to be found a very able refutation of some of the portions laid down before us in an essay read before the Elphinstone College Union by Mr. Lee Warner. It touched almost all the burning questions of the day ripe in the Presidency —the recently passed Mohora flower bill, the attitude of Government with regard to higher education, the question with regard to the efficient management of the Municipalities and so on. It is a speech justly demanding our consideration in as much as every thing which comes from his lips is so. It is a speech well thought and pregnant with wise counsels and suggestions. The programme of the work to be gone through by the Conference was some what lengthy. But looking to the shortness of the time which the Conference had at its disposal it is pleasing to note that every item of it was systematically gone through. The question about the reform and reconstruction, in accordance with the Indian Councils Amendment Act. 1892, of the Provincial Legislative Council moved by Mr. Tilak and duly seconded and supported, the question about the attitude of Government with respect to higher education dealt with in a scholarly way very graphically and statistically by Mr. Gokhale of Bombay, the question about the Public Service Commission discussed by Proffessor Gokhale of Poona in a very able and scholarly speech, the question about the recommendations issued by the commission appointed to inquire into the working of the Deccan Agriculture Relief Act handled by Mr. R. P. Karandiker of Sattara in a closely reasoned speech, the question about the reform of the Municipality dealt with by Mr. Namjoshi of Poona: all these may be looked upon as forming impotant and principal factors of the programme.

Next year the Conference will hold its session somewhere to be fixed afterwards in Gujarath. This means that the Conference is to follow henceforth the noble precedent offered by its august mother the Indian National Congress of annually changing its center. In our opinion the change effected is essential and desirable. In its annual travels from one province this year to another next year it is sure to bring about a visible awakening of the people to a sense of their rights and duties which, if the Conference be confined to one center alone, it will take a long course of time to be manifest on all sides.

The Conference was a complete success owing to the untiring effects of Mr. Bal Gangadhar Tilak, the energetic Secretary of the Conference aided by the Members of the reception Committees.

We have thought it advisible to give merely an outline of the work done by the Conference and not to enter into details of it since they appear in full in the local papers at Poona. We recommend our readers to have recourse to them for full information and particulars with which every one in our opinion ought to be familiar

## वऱ्हाड

हवामान— यंदाचा अंमल कडाक्यानें बसत चालला आहे. रोगराई म्हणण्या सारखी नाहीं.

अलिशान रेसिडेंट मि. क्रौडन साहेब ये· त्या नागवारी फेब्रुवारींत वऱ्हाडांत येणार आहेत असें म्हणतात.

येथील शिक्षक समाजांत उमरावतीचे वकील रा. रा. विश्वनाथपंत काळे व डाक्टर गोविंदराव खोत या दोघांनीं 'विवाह पद्धती' व 'स्त्रियांचे बाळंतपणचे रोग' या विषयावर अनुक्रमें व्याख्यानें दिलीं.

मि एदलजी संजाना यांस मि. ओग्रेडी यांच्या रजेंत इलिचपुरास बदलून बडेनेर कोर्टावर मे. मुबारक अली यांस नेमलें आणि मोर्शीस रा. रा. एकनाथ मोरेश्वर यांस आफि. एक्ट्रा असि० कमिशनर नेमलें.

अकोला हायस्कूल प्रवेश परीक्षेंत ७८ पैकीं १० व उमरावतीस १२३ पैकीं ९२ विद्यार्थी पसार झाले.

'जुबीली कंपनी' या नांवाची एक मंडळी मुंबईस निघाली असून तिच्या जाहिराती या अंका सोबत पाठविल्या आहेत. त्यांना मुंबईहून सामान मागविणें असेल त्यांना या कंपनीचा यथायोग्य उपयोग करून घेतां येईल.

परवां रात्रीं वाशिमकर नाटक कंपनीनें 'रामराज्य वियोग' आणि 'नारायणराव पेशवे यांचा मृत्यु' हे दोन भाग करून दाखविले. रा. गोपाळराव दाते यांनीं सुमेरशिंगाची भूमिका घेतली होती त्यामुळें खेळास रंग विशेष आला होता.

### नोटीस

रा. रा. हनमंत राव वल्लद बोंद्राजी देशमुख राहणार कस्बे अडगाव प्रगणें मजकूर तालुके आकोट जिल्हे आकोले यास मों· खालीं सही करणारीन सारजी चांभारीन राहणार मौजे निज्यांपूर प्रगणें अडगांव तालुके आकोट इसकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तुम्ही मला दरसाल पंचवीस रुपये ठरून देऊन दिडवर्ष पर्यंत ठेविलें होतें त्या दिडवर्षाची रकम ३७॥ साडेसतोतीस रुपये घेणें होते त्या मध्यें जगन्नाथ अनंदा माहजन यांचे दुकानावरून कपडा व रोख नगदी रुपये मिळून रुपये २७॥ वसूल दिला बाकी तुमच्या कडून १० रुपये घेणे राहिले ते रुपये तुम्ही नोटिशीचे तारखे पासून एक महिन्याच्या आंत देऊन माझी पावती घ्यावी. नाहीं पेक्षा मी दिवाणी कोर्टांत फिर्याद करीन. नोटिशीचा व दिवाणीचा दावा करण्याचा जो खर्च पडेल तो सर्व तुम्हास द्यावा लागेल कळावें ता० ११ माहे नव्हेंबर सन १८९२ ईसवी.

(सही)

सारजी मर्द शिवराम चांभारीन व· स्ती मौजे निज्यामपुर निशानी खुद्द हातची नांगडी

## वर्तमानसार

लंडन भूगर्भ प्रांतांत (अन्डर ग्राऊंड) सुमारें ६००० मैल लांब नाले, मोऱ्या इ., ३४००० मैल विद्युत तारा २२७० मैल ग्यासच्या नळ्या व ४५०० मैल पाण्याच्या तोट्या आहेत!

कायद्याप्रमाणें रजिस्टर झालेल्या अशा मुंबईस ९२८ कंपन्या आहेत व त्यांचें एकंदर भांडवल ३५ कोटी रुपये आहे एकंदर भांडवलांपैकीं पाच टक्के गिरण्याकडे गुंतलेले आहेत. चहा, काफी, वगैरेच्या लागवडीकडे सुमारें ३ कोटी रुपये गुंतलेले आहेत. गिरण्यांत गुंतलेलें भांडवल ४ टक्यांनीं वाढलें असून रेल्वे व ट्रामवे यांचें भांडवल ९॥ टक्यांनीं वाढलें आहे.

राष्ट्रीय सभेस मुखत्यार—येत्या महिन्याच्या अखेरीस अलहाबादेस जी राष्ट्रीयसभा भरावयाची आहे त्याकरतां कोणकोणत्या ठिकाणाहून किती मुखत्यार निवडून देण्यांत आले त्याची माहितीः—

गेल्या रविवारीं ठाण्याच्या लोकांनीं दोन मेम्बर निवडून दिले.

२९ व्या तारखेस अलहाबाद लोकांनीं ८१ मेम्बर निवडून दिले. यांत मि. हवर्ड अध्यक्ष होते.

२३ व्या तारखेस सोलापूरच्या लोकांनीं आपल्या तर्फेच्या मेम्बरांची निवड करून दिली.

१,२०,००,००० काडतुसें बिलातेहून हिंदुस्थानच्या फौजेकरतां रवाना झालीं असून मार्टिनी रायफलचीं ६०० काडतुसें एका पेटींत असतात व स्नायडरचीं ११० असतात व अशा दोन पेट्या एका खेचरावरून नेतां येतात असें सांगतात.

चीनच्या राज्यांत आपल्या व्यापाराची वृद्धी करण्याकरतां रशियानें चिनाशीं जो नुकताच तह केला त्या तहाच्या आधारानें रशिया चीनच्या राज्यांत जागोजाग आपले वकील नेमीत आहे असें २९ ची तार सांगत्ये. आजपर्यंत चीनांत रशियाची फारशी ढवळाढवळ नव्हती व ती आतां सुरू झाली असें यावरून होतें.

न्यूयार्क येथें एक कुत्रा असून तो वगैरे पेनसील तोंडांत धरून आपलें नांव चांगल्या रीतीनें लिहितो आणि मनुष्याप्रमाणें चिरूट ओढून आनंद करतो असें सांगतात.

कोणत्याही प्रकारचें रशियाचें लढाऊ सामान सुमान डार्डानेल्सांतून कोणत्याही वेळीं आगाऊ परवानगी घेतल्या वांचून जाण्यास मोकळीक असावी असें रशियानें टर्कीजवळ बोलणें लावलें आहे असें सांगतात.

उसमान डिगमा पुन्हा गडबड करण्यास तयार झाला असून त्याकरितां इंग्रज कामदार सीकीम येथें जाणार आहेत.

इंग्रजी राज्यांत बहुतके सोन्याचें नाणें जसें चालू आहे. त्याप्रमाणें हिंदुस्थानांतही सोन्याचें चालूं करण्याची वेळ येऊं पांचली असें इंग्रज प्रतिपादन करूं लागले आहेत. ठीक आहे सोनें हल्लीं फार महाग आहे त्याची काळजी त्यांस कशास असेल.

सहाराचें विस्तीर्ण वाळवंटी मैदान दिवसे दिवस बागाइत बनूं लागलें आहे? थोड्याच वर्षांत २०,००,००० एकर वाळवंटांत बागाईत केली आहे. एकंदर मैदान बागाईत होण्यास अजून ९०,००,००,००० एकर वाळवंट उपयांत आणलें पाहिजे!

गेल्याच्या मागच्या रविवारीं पाचशें लष्करी लोकांसह एक इंग्रज कामदार कुरम सिडीकडे जाण्याकरतां रवाना झाला.

सरहद्दीवर जीं तटबंदीचीं वगैरे कामें चालली आहेत त्यांची तपासणी करण्याकरतां कांहीं बडे कामदार तिकडे जात आहेत.

कोल्हापूरच्या तरुण राजास आतां मुंबई वरून अजूचा पहाड, जोधपूर, अलवार, भरतपूर, मथुरा, गाझीबाद, सहराणपूर अमृतसर, पेशावर, सिंध, लाहोर, सक्कर, केटा, कराची, वगैरे फिरवून परत मुंबईस आणून परत धारवाडास नेऊन ठेवणार असें बाहेर आलें आहे. धारवाडास मार्च अखेर मुक्काम होऊन पुढें कोठें जाणार आहेत हें मात्र अजून बाहेर आलें नाहीं. विलायतेस नेण्याची बोलवा अजून आहेच व तिकडे गेल्यास त्याच्या बरोबर ठाणें हायस्कूलचे हेडमास्तर मि. सबनीस जाणार अशीही बोलवा आहे.

ही पुढील गोष्ट वाचून म्युनिसिपालिट्यांनी सावध राहावें. मुंबईस भोईवाड्यांत हरी ठकर यानें आपल्या जुन्या पायावर एक नवी इमारत बांधली व तिला रस्त्याच्या अंगास एक ग्यालरी काढली ती ग्यालरी म्युनिसिपालिटीनें पाडून टाकल्या ठकर यानें म्युनिसिपालिटीवर १,००० रुपयांचा दावा केला. प्रतिवादी म्युनिसिपालिटीनें अशी तक्रार केली कीं; वादीनें नवी इमारत बांधली त्यावेळीं घराचा पाया कांहीं फूट मागे हटविण कायद्याप्रमाणें भाग असतां तसें वादीन केलें नाहीं व त्यानें जी ग्यालरी केली ती सार्वजनिक रस्त्यावर आणली होती. हायकोर्ट जज्ज मि. फारन यांणीं असें ठरविलें कीं, म्युनिसिपल ॲक्टाच्या ३ ऱ्या कलमांत सार्वजनिक रस्त्याची जी व्याख्या केली आहे त्याप्रमाणें वादीची ग्यालरी रस्त्यावर होती असें होत नाहीं. याकरतां प्रतिवादी म्युनिसिपालिटीनें आपल्या खर्चानें वादीची ग्यालरी होती तशी बांधून द्यावी आणि फिर्यादीचा खर्च द्यावा. ठा० अ०

लढाईचें वेड—हल्लीं युरोपांत बाहेरून शांतता आहे असें दिसतें, व शांतता राखावी असे प्रत्येक राजा वरवर म्हणतो, पण आंतली स्थिति अति भयंकर आहे असें प्रत्येक राष्ट्राची तयारी आणि एकमेकांवरील अविश्वास पाहून म्हणणें भाग आहे. युरोपांत जर्मनी, आस्ट्रिया, आणि इटाली यांची एक गट्टी आहे. इकडे फ्रान्स आणि रशिया आहे. युरोपांत लढाई उद्भवली तर वरील तिन्ही राष्ट्रें ९० लक्ष फौज समरांगणांत आणतील, आणि फ्रान्स आणि रशिया ही दोन्हीं राष्ट्रें ८० लक्ष फौज आणतील असें म्हणतात. जर्मनी जवळ लढाईच्या वेळेस सपार अशी २९ लक्ष फौज आज तयार आहे, व फ्रान्साजवळ ३२ लक्ष आहे. तरी जर्मन देश आणखीं ६०००० फौज जास्त ठेवण्याच्या बेतांत आहे. गेल्या १० वर्षांत जर्मनीनें फौज आणि आरमाराकडें मिळून २७६०००००० पौंड खर्च केले, आणि पुढच्या १० वर्षांत ३३०००००० पौंड याच कामाकडे खर्च करण्याचा जर्मनीचा बेत ठरला आहे. यावरून युरोप म्हणजे दारूनें भरलेलें कोठार आहे असें कोण म्हणणार नाहीं! यास फुणगी लागण्याचा कायतो अवकाश, ती लागली कीं एका पलांत सगळ्या युरोपाचा भडका होऊन जाईल. ग्रु० सु०

नोटीस

श्रावण्या चांभार राहणार अडगाव तालुके अकोट यांस नोटीस देणार चिंध्या वा॥ धन्या चांभार राहणार सर्कोडे तालुके अकोलें नोटिशीनें असें कळवितों कीं तुझी मुलगी माझे लग्नाची बायको असून तिजला तू आणण्याकरितां तुझा मुलगा नामे कुसण्या यांस बोलवावयास पाठविलें कीं घरीं कंदोरी आहे. लाऊन द्या. त्यांस आह्मी कंदोरी दिवसा बरोबर घेऊन येतो, तू आतां जा म्हणून सांगितलें परंतु तिजला त्या रात्रीं पळऊन नेली त्यास आज सुमारें पाच महिनें जाहाले आह्मी तिजला घेण्या करितां आडगावीं तुझे घरीं आलो त्यावेळीं तू लटके सांगितलें कीं ती आली नाहीं. तुह्मी उगीच आला व ती कोठें गेली याज बद्दल तुह्मास जबाबदारी विचारलें पाहिजे. असें आह्मांस सांगितलें नंतर आह्मी आमची पुतणी अडगांवीं आहेत तेथें गेलो व तपास केला तेव्हां पक्के असें समजलें कीं एक रात्र ती अडगांवीं होती नंतर कुरण खेडास रणी तुझे भावजईच्या घरीं पाठविलीं असें समजलें. नंतर पुन्हां आह्मी आडगांवीं तुजकडे आलो त्यावेळीं सांगितलेसकी पाठवीत नाहीं. तिचा दुसरा घरठाव करून देतो वगैरे त्यावरून नोटिशीनें कळविलें जातें कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत बायको नामे टुकडी इजला आमचे घरीं पावती करावी असें जाहालें नाहींतर बायको ताब्यांत घेण्या बद्दल काम चालवून या नोटिशीचा व अखेर निकाल होईल त्या सर्व खर्ची सुद्धा फिर्याद करून भरून घेऊं व बायको टुकडी इजला ताब्यांत घेऊं ह्मणून दिल्ही नोटीस सही तारीख ८ माहे नोव्हेंबर सन १८९२ इसवी

(सही) ची निशाणी रापी चिंध्या वा॥ धन्या चांभार याची असे.

## जाहिरात

कां फसतां? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधीं विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. म्हणजे आम्ही व्ह्यल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावे

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ८८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचें व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ चातुर्थिक ज्वर म्हणजे चवथारें हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १०५या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोष्ट्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ०१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे बाळें वटसी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर ९ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।=

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट गुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तरकीब अगदीं न सून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जलद गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदोबस्त यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धाशिशी याजवर दर डबीस किं. ।०=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ दुषण एकाएकपास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व वेडा उंदीर इत्यादिस १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व सांधे दुखणें यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ९० गोळ्यांच्या डबीस किं. १०—

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ॥ हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, जळगुत्र, पंडु, सूज व गुलरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु हीं ३ मुलें व २ पुरुषास पुरेल.

२१ सुवर्णमालिनिवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ३॥ रुपये.

२३ नामर्द म्हणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फूल वडस रातांधळे लाली खुपरी चुळ चीपडे गळती यांजवर १ डबीस किं. १०६

या शिवाय पोष्टेज निराळा पडेल.

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेशा मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर अकोला गंगाधरचे माडीवर चौकांत दवाखाना. वऱ्हाड.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराची किंमत
वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१३
साहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।८
किरकोळ अंकास ..........................०।४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०।६
दुसरे खेपेस ........०।१

SUBSCRIPTION
Rs.
Annum in advance 5 Postage 13 ass
Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy.......................................4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10.. 4 as
Repetitio lines ...8 as

VOL XXVI AKOLA MONDAY 21 NOVEMBER 1892 NO 45

वर्ष २६ आकोला सोमवार तारीख २१ माहे नोवेंबर सन १८९२ इ० अंक ४५

डा० वामन गोपाळ याचा
सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह पासून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दूषित झाल्या-पासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायूवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग जसे सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत.

पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फाकरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुस्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तात्काळ नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जातंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियाचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्यांचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा
कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला म्हणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० डेिलेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्यक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.

## जाहिरात हे पाक पाहा

हा हेमंत ऋतु युक्त हिवांतच खाण्यानें पौष्टीक शक्ती व स्फूर्ती व स्मरणशक्ती मिळेल व हस्तपाद व कटी ठणक व शूळ व सर्व वात विकार नाहींसे खात्रीनें होतात व बाळंतीनीस व सर्व स्त्रीयांस गुण देणारें सौभाग्य सुंट हे पाक विक्रीस तयार आहेत लागेल त्यांनीं मागविल्यास व्हालुपेबलनें पाठऊ. पोष्टेज खर्च निराळा पडेल त्वरा करा गेली वेळ येणार नाहीं.

| | |
|---|---|
| सालम मिसरी पाक द० शे० ८० तो. | ३रु. |
| बदाम पाक | २॥ |
| गोखरू पाक | ७ |
| कुस्मांड पाक | ५ |
| सालम मिसरी व बदाम पाक प्रत २ | २ रु. |
| सौभाग्य सूंट | २ |

(पत्ता व सही) शिवचरणगिर रामगीर वैद्य कुरणखेडकर अकोला गंगाधरच माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.

## उनाड मुल.

(४३ वे अंका वरून पुढें चालू)

टोळंभट-- भलतेंच एखादें. असें होईल म्हणून नानांच्या मनीं मानसीं तरी? आज पर्यंत नानांनीं किती उनाड मुलें शहाणीं केलीं, माझा गोंद्या या स्थितीला येईल म्हणून कोणाला तरी वाटलें होतें काय? पण नानांनींच त्याला हे दिवस दाखविले. हा नान्या तर बुवा शुद्ध राक्षस दिसतो. गुलामानें केवढा हो लचका तोडला आणि किती रक्त गेलें. माझ्या तर बुवा अंगावर कांटा उभा राहिला.

नाना— (वरील भाषणांनीं उमेद येऊन) मी त्याला काल पाहिलें, तेव्हां तो मला चांगला मुलगा दिसला व लवकर वठणीस येईल असें वाटलें.

पुष्कळ जण— छेः तो कसचा वळतो! नाना, तुह्मी त्याची गोष्ट देखील काढूं नको. त्याच्या नशिबीं विद्या नाहीं. सूर्यापोटीं शनिश्चर.

पाहिलें ना. जग कसें त्रिविध आहे तें. पहिल्यानें जो तो नानास दोष देत होता. पण मोरू अण्णानें नानाचा पक्ष धरिल्यावर सर्वांचा कल बदलून ज्यांनीं प्रथम नानाची निंदा केली होती तच पुढें त्यांची तारीफ करूं लागले. त्या गांवांत मोरू अण्णाची चार शहाण्या लोकांत गणना होत असे. शिवाय तो घरचा ही खाऊन पिऊन सुखी होता. त्या मुळें त्याचें गांवांत बरेंच वजन असे. एखाद्या सार्वजनिक गोष्टीची वाटाघाट चालली असतां मोरू आण्णाच्या सल्ल्या वांचून तडजोड होत नसे. मोरू अण्णानें नानाच्या तर्फे दोन शब्द काढिले नाहींत, तोंच सर्वजण नानाची तारीफ करूं लागले, असो.

भिकूला नान्याचा शोधकरून आणावयास आऊनें पाठविलें होतें, ह्मणून वर सांगितलेंच आहे. त्यानें त्रिखंड शोधिलें पण नान्याचा कोठें थांग लागला नाहीं. शेवटीं भिकू राहाटाचे बैल सोडण्याची वेळ झाली ह्मणून आगरांत गेला तों समुद्र किनाऱ्यावरून नान्याला आगरांत येतांना भिकूनें पाहिलें आणि त्याला हांक मारिली. नान्या भिकूनाच काय पण घरांतील एकूण एक माणसाचा लाडका होता ह्मणून गणूला चावल्या बद्दल आपल्याला मारतील याचें भय त्याला अगदीं नव्हतें. तो निर्धास्त भिकू जवळ येऊन बैल सोडूं लागला तेव्हां भिकू त्याला ह्मणतो.

भिकू—नान्या, गुलामा त्या गणूला तूं केवढा तरी चावा घेतलास तो? आणि त्यांतून रक्त तरी कितो गेलें! गणू अजून चांगला शुद्धीवर आला नाहीं. ईश्वर करो आणि त्याला लवकर आराम होवो.

नान्या—मामा, मला कां बरें त्यांनीं चोहोंकडून येऊ पकडलें? मी काय त्यांचें

मला किती पण गच्च आंवळून धरिलें? ह पहा बरें माझ्या हाताला कसा करकोचा पडला आहे तो! अजून माझा हात दुखतो आहे.

भिकू— ह्मणून काय झालें? एवढ्या करितां त्याचा जीव का घ्यायचा?

नान्या—चावल्यानें जीव का कुठें जातो? मला चाव बरें, पाहतो कसा जीव जतो तो! मला सोडीचना, मी पुष्कळ ओढून हिसडून पाहिलें पण इलाज चालेना तेव्हां त्याला चावलों. त्यानें माझी विनाकारण खोडी केली ह्मणून त्याला शिक्षा झाली. जशास तसें.

अशा रितीनें ते दोघे बोलत, बैल घेऊन गोठ्यांत गेले. आणि तेथें त्यांनां बांधून घरांत आले. आऊ मागील दारीं तुळशीची पूजा करित होती. नाना मास्तर नुकतेच येऊन आऊला झालेली हकिकत सर्व निवेदन करून आपल्या घरीं गेले होते.

नान्याला वाटलें होतें कीं, आऊ त्याला मारील, रागावेल निदान कांहीं तरी त्याला बोलेल. पण ज्याचें नांव तें, तिनें गणूला चावल्या बद्दल चकार शब्द केला नाही. उलटें नैवेद्याची वाटी पुढें करून नान्याला हाक मारून त्याला दिली आणि ह्मणाली "नारू तुला भूक नाहीं का लागली! जा आंघोळ कर आधीं आणि थोडा दूधभात जेव. मला वरल्या पाखडीस मावांच्या येथें जायचें आहे, तर्थे येतोस ना तूं माझ्या बरोबर"? हे शब्द नान्याचे कानीं पडताच, त्याला मोठा हर्ष होऊन केव्हा आंघोळ करीन आणि केव्हां जवीन असें त्याला झालें. तो पाणचुली जवळ गेला आणि पाहतो, तों पाणी तापलें नव्हतें. ह्मणून तसून तीरासारखा निघाला, आणि विहिरींत उडी टाकली.

नान्या आपल्या घरीं असतां त्याचा पोहतां येत नव्हतें. आजोळी आल्यावर त्यानें एके दिवशीं नारायणाच्या देवळामागें एक तळें आहे, तेथें बरींच मुलें पोहतांना पाहिलीं त्यांत एका मुलानें तळ्याच्या कांठावर एल कुत्रें बसलें होतें तें टाकून दिलें. कुत्रें पोहत दुसऱ्या बाजू कडून निघून गेलें. हें नान्यानें पाहिलें. पोहणें ही कला आहे, शिकल्या वांचून यायची नाहीं, हें नान्यास ठाऊक नव्हतें मुलांस पोहतांना त्यानें पूर्वी कधींच पाहिलें नव्हतें आतां पाहून त्याला आपण ही पाण्यांत जाऊन त्यांच्या सारखें पोहावें. असें वाटूं लागलें इतक्यांत कुत्र्याला पोहतांना पाहून तर त्याची अशी खात्री झाली कीं, प्रत्येक प्राण्याला स्वभावतःच पोहतां येतें. असें मनात येऊन त्यानें लागलीच पाण्यांत उडी टाकली. आणि इतर मुलांप्रमाणें पोहूं लागला एखाद्या नवीन पोहणारा प्रमाणें त्यानें गटंगळ्या खाल्ल्या नाहीं, नाकांत पाणी गेलें नाहीं, कांहीं नाहीं. पण तो वर येऊन त्यानें पुन्हा उडी टाकली. पण या वेळीं त्याच्या मागोमाग दुसऱ्या मुलानें त्याच ठिकाणीं उडी टाकल्या मुळें नान्या बऱ्याच खाल पाण्यांत गेला वरतो यावयास त्यास थोडो अधीक वेळ लागल्या मुळें, तो अगदीं गुदमरून गेला आणि त्याच्या नाका तोंडांत पाणी गेलें. पाण्यावर आल्या बरोबर घाबरल्या सारखा ओरडला आणि पुन्हां गटांगळी खाऊन खाल गेला. त्याच्या ओरडण्यानें दुसऱ्या पोहणाऱ्या मुलांनीं "बुडला रे बुडाला, नान्या बुडाला" असा ओरडा केला. आणि सर्वजण तो बुडालेल्या ठिकाणीं जवळ पुन्हां वर येईल तेव्हा त्यांस हात देण्या करितां जमा झाले.

असो या वेळीं थोडक्यांत चुकलें, नाहीं तर त्याच्या जीवावर येऊन बेतलें होतें. या नंतर नान्या कमरेला सुखड बांधून नित्य पोहायास जात असे, व या कामीं तो लवकरच इतका तरबेत झाला, कीं त्या गांवीं नान्याला मागें टाकणारा एक ही मुलगा नव्हता.

प्रकरण ४

एवढा वेळ जें नान्याचें चरित्र सांगितलें त्यावरून, तो कोणत्या प्रकारचा मुलगा होता व त्याला दोन अक्षरें शिकवायाची ह्मणजे केवढें कठीण काम होतें हें वाचकांच्या लक्षात आलेंच असेल. त्यानें आईबापें सुशील व अनुदार असल्यामुळें व त्याच्या कुटुंबांत आजपर्यंत एक ही दोणता न निघाल्यामुळें, त्यांनीं नान्याचा त्याग केल्या सारखाच होता. आऊनें त्याला खटपट करून गुण आल्यास पाहावें ह्मणून आपल्या घरीं आणिलें. परंतु आजोळी येऊन ही

४।५ महिने झाले, तरी नाऱ्याचा आपला पहिलाच दिवस. त्या गांवांत दोन अक्षरें येतील, असें एकास ही वाटत नव्हतें. सर्वांनी आऊ जवळ नाऱ्याची गोष्ट निघाली असतां ह्मणावें कीं, नाऱ्याला विद्या येईल, तर तळहाताला केंस फुटतील. प्रत्यक्ष नाना मास्तर कीं ज्यांच्या भरंवशावर आऊनें नाऱ्याला आपल्या घरीं आणिलें होतें, त्यांनीं देखील हात टेकिले. ( पुढें चालेल. )

## वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध २ शके १८१४

व्हाइसराय साहेब हैदराबादेस गेल्यामुळें अनेक राजकीय कारस्थानें सुरळीत मार्गास लागलीं हा एक मोठा लाभ झाला. हैदराबाद दरबारची स्थिती चांगली नाहीं, राज्यकारभार घडगतीनें चालत नाहीं, व कामदार असावेत तसें विद्वान व वाकबगार नाहींत अशा पुष्कळ गोष्टी स्पष्टपणें व्हाइसराय साहेबांच्या नजरेस आल्या. ह्मणूनच त्यांनीं निजामसरकारास बोध केला आहे. त्यांत खुबीनें व पाचपेंचानें पुष्कळ ठोंपणा मारला आहे. लार्ड रिपन साहेबांनीं असाच उपदेश केला होता, लार्ड डफरीनचे शब्दही अद्याप जुने झाले नाहींत. आणि लार्ड लॅान्स डौऊन ही चार बोधपर गोष्टी सांगण्यास चुकले नाहींत. तेव्हां मागील प्रमाणें हाही बोधामृताचा पेला सांडून दिला जाईल असा संभव आहे पण या वेळीं निजाम सरकारास हिंदुस्थान सरकारचें आश्वासन अधीक बळकटीचें आहे. नेटिव संस्थानच्या कारभारांत हात घालावयाचा नाहीं हें खरें पण तोच कारभार सुपथास लावण्या पुरता मध्यस्तपणा करण्यास कांहीं एक हरकत नसावी. हिंदुस्थानांत हैदराबादचें संस्थान पहिल्या प्रतीचें आहे. टर्कीच्या सुलतानाखालीं जी प्रजा आहे त्याहून दुप्पट प्रजा निजाम सरकारची आहे. गादीवर बसून आठ वर्षें होऊन गेलीं तरी हा काळ आपलें काम शिकण्यांत निजामाचा गेला पण या पुढें ते आपले उदार विचार लोकसमूहाच्या मनांत भरवतील, राज्यकारभारांत आपली कर्तृत्वशक्ती दाखवितील आणि त्या योगें अनेक पिढ्या त्याचे गुणानुवाद करितील अशी उत्कट इच्छा व्हाइसरायांनीं प्रदर्शित केली. राज्याची सर्व मदार काय ती उत्पन्नावर असते. इतर नेटीव राजेरजवाडे आपला खजिना फार दक्षतेनें सांभाळतात पण निजाम दरबारची स्थिती अपवादक आहे आणि निजामचेंच संस्थान मुख्य आहे. व्हाईसराय साहेब बोलले कीं चार कोटीच्या उत्पन्नापैकीं ७० लक्षाची रक्कम लष्करी खर्चीं प्रीत्यर्थ वेंचली जावी हें ठीक नव्हे आणि ह्मणूनच निजामांनीं कबूल केलेली पलटण व्हाइसरायांनीं नाकारली आणि सांगितलें कीं निजाम सरकार बादशाहिणी फौजेस जेवढें खर घालतील तेवढी ते आपली खाजगी फौज कमी करितील तर हिंदुस्थान सरकार निजामांची देणगी मान्य करितील.

निजाम सरकारास सुधारणा राज्यकारभारांत पुष्कळ केल्या पाहिजेत. हैदराबाद दरबारचा बोभाटा सार्वत्रिक आहे. प्रत्येक खरा व कळकळीचा देशाभिमानी कबूल करील कीं हैदराबाद संस्थानांत अव्यवस्था मोठी आहे आणि ती होईल तितकी लवकर मोडून टाकली पाहिजे. हिंदुस्थान सरकारनें आपला बाणीदार, विश्वासुक, व धुरंधर मुत्सदी निजाम सरकारास कौंसिलदार दिला आहे. मि. लौडन साहेबांच्या सल्यानें सर्व राज्याची व्यवस्था सुपथास लावण्याचा संकल्प निजामांनीं मनोभावें केला पाहिजे. मुंबई मद्रास, कलकत्ता वगैरे कडील विद्वान, वाकबगार, व कर्तव्यदक्ष असे नाणवलेले अंमलदार निजामांनीं मागवावेत हल्लींचा चालू राज्यकारभार समूळ हालवून टाकल्या शिवाय नव्या सुधारणा होणें सुलभ नाहीं. एक पुरुष कांहीं करूं शकत नाहीं. राजा चुकला तरी चालेल पण नृपाधिकाराला नियामक मंत्रिमंडळ फार वजनदार, कुशल व स्वतंत्र विचाराचें पाहिजे आणि ही स्थिति प्राप्त होईपर्यंत कोणतेंही संस्थान उदयास येणार नाहीं. हिंदुस्थान सरकारनें नेटीव संस्थानची मंत्रिमंडळें व कायदेकौंसिलें ज्या रितीनें उत्तम होतील त्या रितीनें आपला अधिकार चालविला पाहिजे आणि असें न करणें ह्मणजे आपल्या सार्वभौमत्वाच्या कर्तव्याला विसरण्या सारखें आहे.

नबाब मेहदी हुसेन यांनीं अब्रूनुकसानी बद्दल जी फीर्याद केली आहे तिचा परिणाम काय होईल हें कांहीं सांगवत नाहीं. खुद्द नबाब आपल्या कामावरून दूर आहेत. त्यांचें प्राबल्य कमजोर झालें, खटल्याचें स्वरूप विचित्र होत चाललें आणि त्यांचे बारिस्टर इनव्हरारिटी यांनीं आपलें अंग काढून घेतलें. उलटपक्षी मि. नार्टन आरोपीचें काम चालविण्यास सिद्ध आहेत. या बेअब्रूच्या लेखाचे प्रकाशक बाबू अत्यावस्थ आहेत ह्मणून तीन दिवस खटला तहकूब आहे.

मुंबईचे प्रसिद्ध डाक्टर मोरेश्वर गोपाळ देशमुख यांनीं असि. केमिकल अनलायझरचे कामाचा राजिनामा दिला त्यास कारण असें कीं सरकारचे नोकरीवर असतांना त्यांचा भर भराटीची खाजगी धंदा युरोपियन वरिष्ठास पाहवेना. या राजिनाम्यानें मोठी चळवळ उडून गेली आणि मुंबईस नेटीव डाक्टराची एक मोठी सभा भरून त्यांनीं अनेक सुधारणा सरकारास सुचविल्या आहेत. मेडिकल सर्व्हिस मधील गोऱ्या लोकांस ज्या मोठमोठ्या हुद्याच्या व भारी पगाराच्या जागा दिल्या जातात त्यांवर इंडियांतील मेडिकल कालेजांतून पसार झालेल्या व वैद्यकीच्या धंद्यांत नांवारूपास आलेल्या नेटीव डाक्टरांस नेमण्याचा काळ आला आहे. कांहीं प्रोफेसरच्या जागीं देखील नेटीव लोक योग्य लायक ठरतील अशी उत्तम स्थिती आली आहे. पांच पंचवीस वर्षांपूर्वीं जे नियम होते ते तसेच सध्यांही लागूं करणें मोठें अन्यायाचें व अनुदारपणाचें आहे. तेव्हां कालानुचित सुधारणा सरकारनें कराव्या व कसकशा कराव्या हें वरील सभेनें स्पष्टपणें सरकारास विज्ञप्ती दाखल करून कळविलें आहे अर्थात डाक्टर देशमुख यांस राजिनामा देणें भाग केलें आणि तो मुंबई सरकारनें स्वीकारला ही केवढी क्षुद्रदृष्टी व अन्यायी पद्धति बरें!

अलहाबादच्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान नामदार दादाभाई नवरोजी स्वीकारतील अशी वार्ता ऐकून सर्व लोक आनंदित झाले होते. पण मध्यंतरीं असें ही कळलें कीं जेट दादाभाई यांच्या पार्लमेंटांतील निवडी संबंधानें क्याप्टन पेंटन हे फिर्याद करित आहेत आणि पार्लमेंट ही जानेवारींत भरणार असल्या मुळें राष्ट्रीय सभेच्या वेळीं येणें दुर्घट आहे. पुन्हा पुण्याच्या मराठा पत्रा वरून समजतें कीं क्याप्टन पेंटन यांचा बहुतेक पाडाव झाला आणि फेब्रुवारी पर्यंत पार्लमेंटही भरत नाहीं तव्हां नामदार दादाभाई यांस आपल्या जन्मभूमीचें दर्शन घेण्यास आणि ह्यूम साहेबांच्या जागीं राष्ट्रीय सभेचीं सूत्रें चालविण्यास कांहीं हरकत नाहीं ही आनंदकारक बातमी खरी ठरो असें आम्ही फार फार इच्छितों.

बंगाल सरकारनें एक जुलमी हुकूम फिरविला आहे त्या योगें त्या इलाख्यांतील कांहीं न्यायकोर्टांतील जूरीची पद्धत बंद करण्यांत येणार आहे हा हुकूम काढण्यास कारणें अशीं दाखवीं आहेत कीं जुरीच्या पद्धतीनें अन्याय होतो असें अनेक वेळा हायकोर्टाचे जज्ज, सेशन जज्ज व जिल्हा माजिस्ट्रेट यांच्या दृष्टीस आलें आहे. अन्याय जुरीच्या सल्यानें अधिक होतो हें विधान बरोबर नाहीं तरी ते खरें समजून ही वरील हुकूम यथान्याय झाला असें लेफ० सर चार्लस इलियट यांस कोणी ही नेटीवहृदयाखेरीज सत्यवादी म्हणू शकणार नाहीं. सरकारांतून जूरर नेमण्याची जी रीत आहे ती आरंभीं चुकीची आहे ती दुरुस्त करण्याचें सोडून ज्यूरीची पद्धत लयास नेण्याचा अनिष्ट संकल्प सरकारनें केला आहे. जे लोक जूरर नेमले जातात ते वजनाचे धड, कायद्याचे ज्ञाते, आणि विचारानें खरे असे पाहिजेत. या प्रकारचे लोक निवडले जावेत अशी रीत सरकारनें योजावी. पण हिंदुस्थान सरकारचा विचार अगदीं लोकमताच्या विरुद्ध आहे. राष्ट्रीय सभेच्या ज्या मुख्य मागण्या आहेत त्या मध्यें जूरीची न्यायपद्धत इंडियांत सर्वत्र लागू करावी अशी एक आहे. राष्ट्रीय सभेच्या मागण्यास पार्लमेंट मान देतें असें नव्या कायदे कौंसिलाच्या कायद्यानें व्यक्त होतें. असें असून ही पार्लमेंटानें दाखविलेल्या दिशे विरुद्ध हिंदुस्थान सरकारानें बंगाल्या कडील जूरीची पद्धत बंद करावी याहून जुलमी हुकमत कोणती असूं शकेल! ज्यूरीची पद्धत वऱ्हाडांत नाहीं तरी आम्हास तिच्या प्रसाराची आशा होती पण ती या सध्यांच्या हुकूमानें अगदीं अस्तास गेली. आणि बंगाल सरकारचा कित्ता दुसऱ्या इलाख्यांतून कदाचित् वळवितील अशी मोठी भिती आहे. तेव्हां बंगालच्या पत्रांनीं चालविलेली रास्त चळवळ इतर प्रांतियांनीं ऐन पल्ल्यास नेऊन पोचविली पाहिजे.

## The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 21 1892.

### THE PRESENT STATE OF IRELAND

Every week more prominently discloses the fact that the affairs of Ireland are going to be a standing dish during the coming winter. It is highly probable that the elements of disorder will come forth with renewed violence It is clear that though Mr. Gladstone and his colleagues may remedy the so-called legitimate grievances of Ireland they will not go far enough to stave off serious trouble. Many agitators of Ireland are already encouraging the non-payment of rent under the evident common-place pretence of indifferent harvest and low prices. There is no arrangement amounting to an absolute bargain between the Government and Ireland, but there are indications of an understanding that they will work together. Mr. Davitt has written a letter to one of the priesthood asking him to communicate with other priests in North and South Meath requesting them to send the names, addresses, and occupations of representative laymen who ought to be Justices of the Peace; for, says Mr. Davitt, it is the intention of the Lord Chancellor to appoint magistrates representing popular feeling. Some Nationalists are seeking to secure the reappointment of certain magistrates who were deprived of their commissions some years ago. A case of the kind has occurred at Youghal where the town commissioners are agitating in favour of Dr. Charles Ronayne who was removed from the magistracy on account of his conduct at disturbances on the Pousonby estate some years since.

The letter written by Mr. Morley to Mr. Carthy on the subject of evicted tenants is a very remarkable phase. Ever since there was a prospect of Mr. Gladstone coming into office a movement has been promoted in Ireland in favour of compensation to evicted tenants. According to some persons this compensation should take the form of an actual money Solatium; according to others tenants should be replaced on their farms, even where it would be necessary to remove existing tenants who have entered into possession. All these evictions it must be borne in mind arose from the refusal of tenants to pay rent. The Government have acceded to this demand to the extent of promising a Royal Commission which will inquire into the actual circumstances.

Messrs Dillan and O'Brien we should remember always boasted that certain rents were not paid because the tenants were ordered to refrain and not because they were unable to pay. So the measure of the Government is the cause of great jubilation in Ireland. It will encourage the outbreak of those feelings of patriotism and exertion for freedom and liberty which the late Government so narrowly repressed.

The Land League often assumed the tenants that they would be defended in the long run against every oppressive coercion. But how far the whole body of electorate will like such a daring policy when the minds of all men barbarous or civilised are selfish enough not to

suffer the least of what they have come to possess, no matter how to be impaired, weakened or loosened. This is threatening to the longevity of the present ministry.

The Parnellites are not well affected toward the Government. At a meeting of the Queenstown Town Commissioners Mr. Doran an eminent Nationalist regretted that a section of the people was disposed to fasten thir faith to Mr. Dillan Mr.. O. Brien and a Home Rule Government. He could make no difference between the present and the former Governments. He went so far as to assert that the present Government was baser than any that preceded and he remembered. This is the feeling of a section of that fiery and generous Nation ever set down! The Dublin Corporation discussed and allowed to fall back by a majority of one, no matter whether it was so slender or overwhelming the result is the same, the proposed revival of the old custom of presenting the incoming Viceroy with an address of welcome on the part of the Corporation. This also is no small indication that the nation remains as exasperated and turbulent as ever. It is just what circumstances have made it?

Mr. John Redmout the leader of the Parnellite party has just formulated afresh the demands of Ireland in the Nineteenth Century. His ideas have a certain amount of interest when at this particular juncture the Grand Old Man of England is preparing his new Home Rule Scheme. He defines Ireland's position thus:—"we are not asking for the repeal. We are not asking for the restoration of Grattan's Parliament; we are willing to accept a statutory Parliament with the executive responsible to it, leaving untouched the Supremacy of the Imperial Parliment, save only so far as by parliamentary compact that Parliament shall bind itself to leave the supreme control of certain Irish affairs in the hands of the Irish Legislature. Certain subjects which touch Imperial concerns, and certain other subjects which touch questions of religious liberty may be reserved from the Irish Legislature; but the full sole control of all Irish questions not so reserved must be vested in the Irish Legislature; among them prominently the questions of police, judiciary and land."

Mr. McCarthy has issued a manifesto on behalf of the anti—Parnellite party. It is chiefly interesting and noteworthy because it fixes Mr. Gladstone with the responsibility to introduce a Home Rule Bill satisfactory to the Irish Nationalists.

We had briefly summarised the position of Ireland in our leaders on the late General Elections. Thus we have summarised the condition of Ireland upto date.

---

The approaching Congress at Allahabad is invested with more than ordinary significance, and it were as well that we should realise betimes our responsibilities in that connection, and prepare ourselves for the discharge of onerous duties that devolve upon all of us who have tne good of their country at heart. According to all human calculations, Mr. Dadabai Naoroji, M. P, will preside on the occasion, and if for nothing else, but to catch a glimpse of that worthy son of India, should we muster strong round his honoured figure and by the weight of our numbers strengthen his unique position at home, and convince the British electorate that he is the most representative Indian of the day. The subjects, too, for consideration this year, are of special interest and imperatively call for a peculiar attention from a vast body of our countrymen. We have hitherto fought for a reconstruction of the Legislative Councils, indeed the Congress has existed primarily for its sake. We have secured an important concession in that particular. It may be that the Indian Councils' Act does not meet all our demands, but nonetheless the fact remains that but for the Congress, ridiculed and twitted as it was in its inception, the Act would have never come into existence, at least, so soon, and to our mind there is no more convincing proof of the utility of moderate, but unceasing constitutional agitation, than this statutory recognition by a Conservative Government of the political aspirations of the Indian people. It is an important step gained, and it must serve as an incentive to continued agitatation along the same lines. There remain however, the framing of the rules upon the Act, by the Indian Government, and we cannot at all afford to be remiss at this juncture. The Congress must make practical suggestions in that direction, and the Government would do better to defer its action till the Congress had its say. Nor is the reconstitution of the British Committee, a less prominent item in the Congress programme, and the delegates must decide once for all at the next sitting of the Congress, if the Committee is to be retained, and if so, in what form. It is all a question of ways and means, and let us not conceal from the that they would ... at the several centres, slender resources by liberal contributions from their respective constituents. The Indian Currency problem shall also have to be faced and Government aided in its difficulty with wise counsels in that respect. Nor must we forget that, now that the Liberal Government is in power, we must all put our shoulders to the wheel, and bring about the London Session of the Congress at an early date. Personally we feel oppressed by a weighty sense for one responsibility by reason of the peculiar position we at this moment occupy and it is only the hearty cooperation of our friends that can enable us to discharge creditably the onerous duties that have been imposed upon us. Mr. Hume will not be here this time and our power of independent action will be tested. "Remember," said he at Nagpore, "that our opponents have always been telling the world—you and I know how false it is—that these Congresses depend entirely upon Mr. Hume. It will be for you to show next year, when Mr. Hume has not been near the country for twelve months, that you can serve the Congress yourselves as well as or better than it has ever been, even when Mr. Hume was present. I lay this burden upon you." Let us hope that the duty so solemnly laid upon us, will be sacredly fulfilled.—*The Bangalee.*

---

## वऱ्हाड

हवामान — यंदा थंडीचें मान विशेष दिसतें. सर्व पश्चिम हिंदुस्थानांत आकोल्यास पारा फार कमी ह्मणजे ४७वे अंशा पर्यंत उतरला होता. रोगराई विशेष नाहीं.

मि. आवर्ड सिव्हिल आणि सेशन जज्ज वऱ्हाड हे सहा महिन्यांच्या रजेवर विलायतेस गेले होते ते गेल्या गुरुवारीं आपल्या कुटुंबासह मुंबई बंदरीं परत येऊन काल्च्या गाडीनें उमरावतीस गेले.

खाली लिहिल्या प्रमाणें असिस्टंट कमिशनर लोकांच्या बदल्या करण्यांत आल्या आहत. आणि या नव्या वर्गावर्गीनें प्रत्येक जिल्ह्यास एकेक असिस्टंट कमिशनर ठेवण्यांत आला आहे:—

मि. आर. ए. सम्पसन– उमरावतीहून वाशिमास; लेफ्टनंट हेग – आकोल्याहून यवतमाळास, मि. एफ. प्रिडो– यवतमाळाहून इलिचपुरास, मि. हार्सब्रुव– इलिचपुराहून बुलढाण्यास.

कर्नल मेकंझी कमिशनर वऱ्हाड यांची स्वारी व्हाईसराय साहेबांस भेटण्या साठीं हैदराबादेस गेली होती ती गेल्या सोमवारीं परत उमरावतीस गेली व तेथून हल्लीं ते इलिचपुरास दौऱ्यावर गेले आहेत.

तारीख १५ मंगळवार रोजीं मे. मुबारक अली एक्स्ट्रा असि. कमिशनर यांनीं बडनेरा कोर्टाचा चार्ज घेतला आणि मि. एदलजी संजाना इलिचपुरास गेले आहेत.

रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ जोशी अव्वाची यांस सिकंदराबाद कानटानमेंटच्या हद्दीत फर्स्टक्लास माजिस्ट्रेटचे सर्व अधिकार व दिवाणी १००० पर्यंतचे दावे चालविण्याचे अधिकार देण्यांत आले आहेत.

रा. रा. गणेश बापूजी उडगीकर यांची एक्स्ट्रा असि. कमिशनरचे जागीं बढती झाल्यामुळें त्यांच्या दुसरे वर्ग तहशीलदारीवर रा. रा. वामन गणेश बोराखडीकर यांस व त्यांचे तिसरे वर्गांचे जागीं रा. रा. विष्णु हरी यांस कायम केलें.

[illegible]

हे सहा महिन्यांचे आजारीपणाचें रजेवर गेल्या कारणानें त्यांचे जागीं मि. सुबेल असि. सुपरिन्टेंडंट यवतमाळ यांस नेमलें.

क्याप्टन कोलंब असि. कमिशनर आकोला यांस पहिले वर्ग माजिस्टेट नेमलें आणि दिवाणी संबंधानें त्यांचे कोडतास तिसरे वर्ग असि० कमिशनरचे अधिकार दिले.

रा. रा. एकनाथ मोरेश्वर यांस एक्स्ट्रा असि. कमिशनरची जागी तीनमहिन्या साठीं मिळाल्यामुळें त्यांनीं आपली हक्काची तीन महिन्यांची रजा मंजूर होऊन आलेली रद्द केली. हे पेन्शनदारांच्या यादींत निघाल्यामुळें सध्यां मुद्दाम वाढविलेल्या मुमुदतींत काम करीत आहेत.

अहगांवास गेल्या कार्तिक वद्य ३ व ४ रोजीं श्री मारुतीची यात्रा भरली होती. दोन तीन वर्षांपासून ही यात्रा मोठी टोळेजंग भरत असते. उत्साह निमित्त पन्नास साठ दिंड्या आल्या असून भोजनाच्यावेळीं दहा हजारावर पात्र झाले.

---

नोटीस

सितारान वल्लद नारायण कुणबी सांगुळवेढे राहणार खंडाळे तालुके अकोट जिल्हे अकोलें. यांसः—

नोटीस देणार कौसल्या मर्द सितारान राहणार घोडेगांव तालुके अकोट. यांस नोटीशीनें असें कळवितें कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून तुह्मा पासून मजला एक मुलगा झाला होता तो मयत होऊन आज ८ वर्षें जाहालीं. व तुह्मी मला विनाकारण माराहाण करून माझे हाल करीत होता. ह्मणून मी आज अजमासें ७–८ वर्षें आपले बापाच्या घरीं तुमचे नांवावर कर्ज काढून राहिले. मध्यंतरीं बहुत वेळां तुह्मी मजला घेऊन जावें ह्मणून खटपट केली. परंतु तुह्मी ह्या वेळ पावेतों मजला नेलें नाहीं व माझ्या पोट पाण्याची वगैरे सोय कांहीं केली नाहीं. आतां मजला निरउपाय होऊन असें कळविणें भाग आहे कीं, ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत तुह्मी माझ्या पोटापाण्याची बरोबर तजवीज करून व मजला मारहाण वगैरे करणार नाहीं. व चांगल्या रीतीनें वागवाल व इतके दिवस कर्ज काढून तुमचें नांवावर रुपये ( ३०० ) तीनशे खाल्ले ते देऊन चार जातभाईची खात्री करून मजला घेऊन जावें. असें केलें नाहीं तर पोटगी बद्दल व खावटीचे रुपये ३०० बदल सरकारांत काम चालविलें जाईल. आणि तुह्मी मजला नेत नाहीं ह्मणून मनला दुसरा घरठाव करणें भाग पडेल. व मी नंतर करीन. मग तुमची कोणचे ही प्रकारचा हक्क मजवर नाहीं. हें सर्व तुह्मास या नोटीशीनें अगोदर कळविलें आहे तर काय तो निकाल नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत करून कळवावें. ह्मणून दिली नोटीस सही तारीख १८–११–९२ इ०

( सही )

निशाणी बांगडी कौसल्या मर्द

सितारान इच्या हातची

असें दस्तुरः–

शिवराम वल्लद चंद्रभान राहणार घोडेगांव ता०आकोट.

---

नोटीस

विष्णु गोपाळ पाळखे व किसन वा॥ विठोबा सुतार रहाणार भवरद यांसः–

नोटीशीनें कळविलें जातें कीं, आमची शेतें भवरद येथील सर्वे नंबर १३ व ९७ हीं तुह्मी एक सालीं करारांनीं केलीं आहेत. त्यांची स्वामित्वाची रकम रुपये २५२०४ दोनशें बावन चार आणे आहे. व किस्तकारी बदल पचांनीं ठरविलेली रकम रुपये ( १२०७ ) पर्यंत ह्याजबदल रुपये वायद्यावर देण्याचा व किस्तकारी करून शेत दुरुस्त करण्याचा जामीन द्या आणि मग शेतांतील माल न्या. अशी नोटीस तुह्मास तारीख २९ आक्टोबर सन १८९२ रोजीं पोस्ट मार्फत दिली ती समजून उमजून घेत नाहीं ह्मणून परत केली. आतां कपाशीचा माल वेचून तुह्मी नेला आहे.

ह्यास्तव ही नोटीस देतो रुपयांचा व किस्तकारी करून शेत दुरुस्त करून देण्याच जामीन ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून आठ दिवसांत द्या आणि मग माल न्या. जामीन दिल्या वाचून माल न्याल व किस्तकारी ह्मणजे नांगरणें, वखरणें, व कुंधाकाडी काढून चारी मेरा साफ आणि बांध, व वरूळ्या ही रुढा प्रमाणें दुरुस्त न करालं तर रकम रुपये १४५९०४ चवदाशें एकूणसाठ चार आणेचा व नोटीशीच्या खर्चीचा तुह्मावर दावा करून भरून घेऊं. ता० १९—११—९२ इ०.

अमृतराव आबाजी कर्णिक द. खु.

---

## वर्तमानसार.

सोलापूर म्युनिसिपालटी मोठाल्या रकमा निकारणें खर्ची घालीत आहे हें फार वाईट करीत आहे असा ठराव करून म्युनिसिपालिटीस कळविण्याकरतां तसल्या ठरावांस आपल्या तर्फेच्या मुखत्यारांनीं काय ह्मणून संमती दिली असें त्यांस विचारण्याकरतां सोलापूरच्या एका वार्डांतल्या २००० लोकांची गेल्या ४ थ्या तारखेस एक मोठी सभा झाली व त्यांत तसे तसे ठराव होऊन आपल्या तर्फेच्या ज्या दोघी मेम्बरांनीं त्या खर्चास व कर वाढविण्यास संमती दिली त्यांस दोष देण्याचाही ठराव केला. लोक अशा तऱ्हेनें वागूं लागले ह्मणजे त्यांच्या तर्फेच्या मेम्बरांनीं त्यांची भिती बाळगण्यासही तयार झालें पाहिजे. सोलापूर म्युनिसिपालिटीतील बाघडे आलीकडे फारच बाहेर येऊं लागले आहेत व तें तेथील पुढारी लोकांस भूषण आहे असें वाटत नाहीं.

बडोद्याच्या हद्दींत आणि विशेषकरून कडी प्रांतांत तापाची साथ फार जारानें सुरू झाली आहे. त्या रोगाचा पाडाव करण्याचे उपायही त्या सरकाराकडून तशाच झपाट्यानें चालू आहेत.

गुजराथ प्रांतांत तापसराई फार झपाट्यानें चालू झाली असून त्याकरतां लोकांत बरीच चळवळ सुरू झाली आहे.

१२ पौंडाच्या तोफांचे हिंदुस्थानांत २९ तोफखानें आहेत व त्यांस नवीन तऱ्हेचीं हत्यारें देण्यांत येत आहेत.

येत्या सपटंबर किंवा आक्टोबरांत सिमला येथें पब्लीकवर्क खात्याचें एक कान्फरन्स भरणार असून त्यांत वेगळाल्या ठिकाणचे वेगळाले कामदार हजर असणार आहेत. काय मुद्यावर विचार व्हावयाचा हें मात्र बाहेर आलेलें नाहीं.

विलायतच्या बेरोजगारी लोकांची गेल्या ४ थ्या तारखेस एक मोठी सभा झाली व त्यानंतरही कांहीं झाल्या आणि ते सरकाराशी भांडण्यास आतां अगदीं तयार झाले आहेत. तांबडीं निशाणें व भयसूचक चिन्हें बरोबर घेऊन त्या लोकांचे मोठाले जमाव इकडून तिकडे हिंडू लागले आहेत.

विलायतची शेतकी यंदा अगदीं बुडाल्यासारखी झाल्यामुळें शेतकऱ्याच्या स्थितीचा विचार करण्यासाठीं एक टोलेजंग सभा भरली जात आहे.

निझामांचे जुने रिविन्यु सेक्रेटरी नबाब मस्तक हे एकीकडे होऊन त्यांच्या जागीं हसन उलमुक यांची नेमणुक झाली व त्यांच्या जागीं हसन उलमुक यांची नेमणूक झाली व त्यांसच जनरल सेक्रेटरीचेंही काम सांगितलें. तसेंच होम सेक्रेटरी मेदी हसन यांस सस्पेंड करून आतां चाकरीतून मर्जीच काढून टाकल्यामुळें त्यांच्या जागीं हायकोर्टाचे जज्ज नबाब इमद् जंग बहादुर यांची नेमणूक झाली आहे.

त्रिचनापल्ली येथील कांहीं स्त्रियांची एक टोळी जमून मोठाल्या चोऱ्या करण्याचा धंदा करतात व चोरीचा माल विकून पैसे करण्याचे काम आपल्या नवऱ्याकडून करवितात असें नुकतेंच बाहेर आलें असून त्याप्रमाणें कांहीं स्त्रियांस पकडून शिक्षाही झाल्या व आतां त्यांच्या नवऱ्यांचा तपास चालू आहे.

प्रसिद्ध डिग्बी साहेब मद्रासेस जाऊन दाखल झाले व स्टेशनावर त्यांचा सत्कार करण्याकरतां पुष्कळ नेटिव हजर होते.

तुरी लोकांवर जो नुकताच हल्ला झाला त्यांत कुरम खिंडींतल्या इंग्रज कामदारास पेशावर कोटल येथें पाठविण्यांत येत आहे.

लश्करी कामाच्या उपयोगाकरतां नवीन तऱ्हेच्या खेचरांच्या उपयुक्त गाड्या तयार करणारांस मोठाल्या रकमा इनाम देण्याचें सरकारानें कबूल केलें आहे.

वानरी सुईण—थोडे दिवसांपूर्वीं कांहीं गृहस्थ जलवाडी येथील झाडाखालीं बसले असतां एक बाळंत होणारी वानरी त्यांचे दृष्टीं पडली. तिच्या भोंवती, पुष्कळ वानरें जमलीं होतीं. तिच्या पोराचा एक पाय बाहेर आला होता आणि एक वृद्धवानरी तिचें पोट चोळीत बसली होती. इतर सर्व वानर दिलगिरींत दिसले. इतक्यांत तो वृद्धवानरी दारीचें पोट चोळीत बसली होती. इतर सर्व उड्या मारीत तेथून निघून गेले आणि कांहीं वेळानें ते कांहीं झाडपाला तोंडांत घेऊन आले. तो पाला त्या ह्मातारीनें त्या बाळंत होणाऱ्या वानरीस खाण्यास दिला तेणेंकरून १० मिनिटांनीं ती बाळंत झाली. जनावरांचें कसें ज्ञान आहे पहा. ठा० अ०

जगांतील अतिशय लहान चतुष्पाद प्राणी ह्मटला ह्मणजे सैबिरिया देशांतील उंदीर होय.

जगांत रोज सरासरी तीन हजार लग्नें होतात.

रायक साव्हरिन या नावाचें जें नवीन इंग्लिश लढाऊ गलबत झालें आहे. त्यावर ८०० विजेचे दिवे आहेत व ते जोडण्याला तीस मैल लांबीची तार लागली आहे.

१८१५ सालीं झालेल्या वाटर्लूच्या लढाईतील आठ योद्धे अजून फ्रांन्सांत जीवंत आहत. नाबुवतच ह्मणायेच हे!

किंबरले (दक्षिण आफ्रिका) येथें दर आठवड्यास एक लक्ष पन्नास हजार पौंड किंमतीचे हिरे सांपडतात.

शिकागो शहरीं जी जगद्यात्रा भरणार आहे. त्यांत वाटाण्याच्या शेंगा विकण्याचा मक्ता एकानें १,२०,००० डालरांना देतां का!, ह्मणून विचारलें आहे.

जपानांत प्रत्येक मुलाला दोनही हातांनीं लिहिण्याला शिकवितात.

हिंदुस्थानांतील ४,००,००,००० माणसांना पोटभर जेवायाला मिळत नाहीं.

लंडन शहराखालीं काय काय आहे आणि काय काय नाहीं याचा सुमारच नाहीं नाहीं. गटारें एकंदर ३,००० तीन हजार मैल लांबीचीं आहे जमिनीखालीं तारायंत्राच्या तारांची लांबी ३४,००० मैल लांब आहे. ग्यासाच्या नळ्यांची लांबी ३,२०० मैल आहे आणि पाण्याच्या नळ्यांची लांबी ४,५०० मैल आहे. व हें सर्व वाढत्या प्रमाणावर आहे. क० णु०

व्हाईसराय साहेबांस नजर—ह्मैसुरास व्हाईसराय साहेबांची स्वारी गेली आहे तेव्हां त्यास नजर देण्यासाठीं ज्या वस्तु तयार केल्या आहेत त्यांत राम, सिता, गणेश, हनुमंत अशी चंदनाची अनेक चित्रें तयार केलीं आहेत. ह्या बाहुल्यांच्या कारागिरींत तिकडील कसब्यांनीं फार उत्तम कौशल्य दाखविलें आहे, यामुळें तीं चित्रें फार च फर्मास झालीं आहेत असें तिकडील एक बातमीदार कळवितो.

अमिरावर सक्ति करण्याची सूचना—लंडन टैम्स नामक प्रख्यांत व वजनदार पत्रानें हिंदुस्थान सरकारास अशी सूचना केली आहे कीं, हिंदुस्थान सरकारच्या मिशनची भेट घेण्याची तारीख अमीर मुद्दाम लांबवीत आहे सबब मिशनची भेट लौकर घेण्या साठीं हिंदुस्थान सरकारानें त्यावर सक्ति करवी.

कार्यकारण भाव— रशियाच्या फिनलंड नामक प्रदेशांत एक जातीचा दगड सर्वत्र सांपडतो. हा दगड ह्मणजे सृष्टी निर्मित हवामान दर्शक यंत्र आहे, त्याच्या योगें हवेंत केंाण केंाणते फेरफार होणार हें समजतें याला तिकडे "समाकइपूर" असें ह्मणतात. पाऊस पडावयाचा असला ह्मणजे हा दगड काळा होतो, आणि स्वच्छ व्हावयाची असली ह्मणजे त्यावर पांढरे पाढरे ठिपके येतात. कित्येक दिवस हा दगड ह्मणजे एक अद्भुत गोष्ट असें लोकांना वाटत असे शास्त्रज्ञांनीं ह्या दगडाचें पृथक्करण पाहिलें तेव्हां चिकण माती, दगडी मीठ आणि सोरा ह्यांनीं तो बनला आहे असें समजलें तेव्हां तो हवामान कां दाखवितो ह्याचें कारण समजलें. पाऊस पडावयाचा असला ह्मणजे त्यांतील मीठ हवेंतील ओलावा शोधून घेतें ह्मणून तो काळा होतो. हवा साफ व्हावयाची असली ह्मणजे रुक्षपणानें त्यांतील मीठ बाहेर येतें ह्मणून त्याचे ठिपके दगडावर उठतात. श० सू०

एक विक्षिप्त विचार:—जगांतील स्त्रीशिक्षणानें मुसमुसलेल्या तरूण पोरी बेधडक वेळ अवेळ न पाहतां घरातून बाहेर वाटेल त्या दुकानांत जाऊन हवी ती मजा करितात. खातात, पितात, पत्ते खेळतात, इतकेंच नव्हे पण परकी पुरुषांस अपत्या ज्ञ कृगांतरी आ[illegible] कारसात स्त्री शिक्षणचा असाच परिणाम होणें योग्य आहे! हा विचार येथील विक्षिप्त पत्रांत प्रसिद्ध झाला आहे, यावरून तो विक्षिप्त तऱ्हेचाच आहे हें सर्वांस सहज उघड दिसेल. सु० प०

## जाहिरात

कां फसतां? इकडे थोडें लक्ष द्या.

आमचे दवाखान्यात सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्त्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्ह्याल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें

१ नजकणावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचें व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ चातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारें हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारें, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्यांच्या डबीस १।ऽ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ऽ१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे वडंब वटसी बाधा व मंदर सर्व तऱ्हेच्या किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर २ दिवसांत गुण. लावणें व खाणें याच्या डबीस किं. ।=

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट गुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं न सून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व धुरें व उन्माद यावर अगदीं जलद गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे १ डबीस किं १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धशिशी यांजवर दर डबीस किं. ऽ=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारल्यास व कुरंडीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रे व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अमर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें यांवर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्यांच्या

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फमगी उर्फ मज्जागतवात व शूळ यांजवर लवकर १५ मिनिटात गुण १ डबीस किं. ॥ हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कफूळ, नळगुद, पंडु, सूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. हां ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फुल वडस रातांधळें लाली खपरी चुळ चीपडे गळती यांजवर १ डबीस किं. १ऽ६

ह्या शिवाय पोष्टेज निराळा पडेल.

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेशा मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर
वैद्य कुरणखेडकर अकोला गंगावरचे
माडीवर चौकात दवाखाना.
वऱ्हाड.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराची किंमत
वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१३
साहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " ०।८
किरकोळ अंकास ........................०।४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०।१

SUBSCRIPTION
Rs.
Annum in advance 5 Postage 13 ass
Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly...........3 " 8 as
Single copy.................................9as

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition perline 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 28 NOVEMBER 1892 NO 46

वर्ष २६ आकोला सोमवार तारीख २८ माहे नोवेंबर सन १८९२ इ० अंक ४६

डा० वामन गोपाळ याचा
सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह पासुन खाली लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणें, सूज येणें सर्व संधिगत वायूवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फाफरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुश्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुसकत्व इत्यादि विकार तात्कालीन नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जातंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियाचें पुनरुःज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळयाचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून किती ही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा
कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिष्ट रंगाचेकेस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० ठिक ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्हो. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.

## जाहिरात.

सर्वत्र अकोटकर व इतर मंडळीस विनंती करण्यांत येत आहे कीं, माझें तर्फे काम चालविण्या साठीं सदाशिव लक्ष्मन देशमुख आकोट यांचे ता. २३—२—९१ रोजीं जनरल मुखत्यारपत्र दिलें होतें त्यांत अशी शर्त होती कीं माझे लेखी परवानगी शिवाय कोणतेंही कृत्य करूं नये. तें केल्यामुळें मी सदरहू इसमाचें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. करितां १—१२—९१ नंतर जो कांहीं माझे नांवानीं दस्तऐवज किंवा गहाणखत किंवा रसीद किंवा पट्टा किंवा काल जें कांहीं दिलें असतील किंवा देईल तें माझें समती शिवाय आहेत तें मजला मान्य होणार नाहीं.

सदरहू इसमाचें मुखत्यारपत्र ही मी परत घेतलें असून त्याज जवळ नाहीं.

त्याचे व आमचे जिनगीची वाटणी झाली आहेः—

| | | | |
|---|---|---|---|
| देऊळगांव येथील | सर्वे | नं० | १४ |
| आकोट येथील | " | " | २३९ |
| चेंडकपूर येथील | " | " | १३३ |
| कडतवाडी येथील | " | " | ५५ |
| चिंचखेड येथील | " | " | २२ |

ह्या शेता संबंधीं कोणताही लेखी दस्तऐवज किंवा गहाणखत, पट्टा. कौल, रसीद, आंब्याचा बार विक्री. ह्या कोणत्याही माझें स्वतःचे दस्तूरचे सही शिवाय तें कृत्य मान्य केलें जाणार नाहीं. ही विनंती ता० २३—११—९२

( सही )
केशव देवराव देशमुख अकोट दस्तुर खुद.

नोटीस

रा. रा. सिदु वा॥ येकोजी भगत राहणार कदमापुर ता० खमगांव यांसः—

नोटीस देणार दवलत वा॥ रावजी गाढव राहणार कदमापूर नोटीशीनें असें कळवितों कीं, तुह्मी माझी मातोश्री नामें आहेलाई इज पासून कदमापूर येथील राहतें घर व गुरें बांधण्याचा गोठा गवती असें दोन्ही मिळून रुपये ५० पन्नास खरीदी करून घेतलें आहे. असें मजला नुकतेंच समजलें व या तुमच्या करण्यास तीन महिने होऊन गेले असें ही कळतें. याज करितां तुह्मास असें कळविलें जातें कीं, माझी आई आहेलाई इजला खरिदी देणें वगैरेची कोणचे ही प्रकारचा हक्क नाहीं. तुह्मी मातोश्रीस रु० ५० पन्नास दिलें त्याज बद्दल आह्मी व स्थावर जंगम इस्टेट वगैरे कोणचेही प्रकारचे जबाबदार नाहीं. आगे मागें तुह्मी विनाकारण फिर्याद वगैरे केल्यास त्याज बद्दल खर्चवेचाचे वगैरे बद्दल आह्मी जबाबदार नाहीं. व तुह्मी सदरील घर व कोठा याजबद्दल खरिदी कागद करून घेतला आहे तो ही रद्द आहे. आह्मास कबूल नाहीं ह्मणून दिली नोटीस सही ता० २२ माहे नोवेंबर सन १८९२ इसवी.

( सही. )
सहीची निशानी वखर दवलत वा॥ रावजी गाढव याचे हातची असे दस्तुर येकोआप्पा विराप्पा..

## उनाड मुलगा.

(४५ वे अंकावरून पुढें चालूं.)

एके दिवशीं ते आऊला ह्मणाले."आऊ तूं कांहीं ह्मण मी ह्मणून पुन्हां नान्याचें नांव देखील घेणार नाहीं. आणि हें बघ, आऊ, तुला सांगून ठेवितों, कीं नान्याला विद्या येईल तर तूं काय ह्मणशील तें ऐकेन. तूं कांहीं याच्या भरीस पडूं नको. त्याच्या बापाला ह्मणावें, ब्राह्मणाच्या जन्मास आला आहे, त्याची मुंज करून टाक आणि शेतीच्या कामीं गड्यावर देखरेख करण्या करितां याला पाठवीत जा. त्या कामीं हा चांगला हुशार आहे. ज्याचा जिकडे कल असतो, तिकडे त्याला घातलें, ह्मणजे त्या कामांत तो चांगला वाकब होऊन किर्ती मिळवितो.

या प्रमाणें आऊला सर्वांनीं नाउमेद करून सोडलें. तथापि ती अगदींच निराश झाली नाहीं. तिला अद्याप ही नान्या चांगला विद्वान होईल असें वाटे. आपले उपाय चुकतात, अशी तिची खात्री झाली. ह्मणून ती नित्य विचार करीत बसे. तिनें अनेक युक्ती मनांत आणिल्या त्यांतली तिला एक ही पसंत झाली नाहीं. एके दिवशीं आऊ नान्याला बरोबर घेऊन देवीच्या देवळांत जात असतां वाटेंत एक हलवायाचें दुकान होतें. तेथें आऊनें एक पैशाचा खाऊ घेऊन नान्यास दिला. त्यानें तो तेथच्या तेथेंच चट्ट केला. दुसरें कोणी असतें, तर नान्याच्या या खाऊ खाण्या पासून त्याला त्रास आला असता. आऊला मात्र तसें झालें नाहीं, उलटें नान्याच्या या आधाशीपणानें तिला थोडी उमेद आली असें तिच्या पुढील कृत्यावरून दिसून येतें. आऊनें रोज संध्याकाळीं देवीच्या दर्शनाला जाण्याचा व जातांना नान्याला खाऊ घेऊन देण्याचा क्रम सुरूं ठेविला. एके दिवशीं आऊपाशीं पैसा नव्हता; मग तिनें मुद्दाम आणिला नव्हता, किंवा ती सहज विसरली हे कांहीं कळत नाहीं. ह्मणून हलवायाच्या दुकाना समोरच नाना मास्तरांची शाळा होती, तेथें जाऊन तिनें नानांपाशीं एक पैसा मागितला. त्याचा खाऊ घेऊन नित्या प्रमाणें नान्यास दिला. असो अशा रीतीनें नान्यास खाऊची चांगलीच चटक लागली. ती इतकी कीं एखादे दिवशीं जर त्याला खाऊ मिळाला नाहीं, तर त्याला चैन पडत नसे.

असें कित्येक दिवस लोटल्यावर एके दिवशीं आऊ नान्यास ह्मणाली, "नारू आज पासून मला नारायणाच्या देवळांत पुराणाला जायाचें आहे. देवीच्या देवळांत मी आतां जाणार नाहीं. तुला खाऊ पाहिजे असला तर, शाळेंत जाऊन नानां पासून रोज एक पैसा तूं घेत जा. ते तुला देतील. मी त्यांनां सांगून ठेविलें आहे." हें ऐकून नान्याला एक प्रकारें आनंद झाला खरा, पण शाळेंत जाऊन पैसा मागण्याचें त्याच्या जीवावर आलें. नान्याला नानांचें घर ठाऊक होतेंच; तो मनांत ह्मणाला, नानाला जर आऊनें मला पैसा द्यायाला सांगून ठेविलें आहे, तर तो त्यांना केव्हां तरी देणें आहेच; मग शाळेंत काय आणि घरीं काय. शाळेंत जाण्यापेक्षां त्यांच्या घरींच जाऊन पैसा घ्यावा ह्मणजे झालें. दुसरें असें कीं, नानांजवळ तरी शाळेंत पैसे कुठले असणार! परवां आऊनें त्यांच्या जवळ सहज पैसा मागितला, पण तो त्या वेळीं त्यांच्या जवळ पैसा होता ह्मणून बरें झालें. एरवीं त्यांच्या जवळ शाळेत पैसा असण्याचें कारण नाहीं. असा विचार करून नान्या नानांच्या घरीं गेला. नाना त्याला ह्मणाले नान्या, आऊनें तुला रोज एक पैसा द्यायला मला सांगितलें! आहे खरें. पण मी आपले पैसे घरीं कधींच ठेवीत नाहीं. शाळेंत सरकारी मजबूद पेटी आहे, तींतच मी आपले खानगी पैसे ठेवितों. तुला वाटेल, तर शाळा उघडल्यावर तूं तेथें ये.

नानांनीं खाऊच्या पैशाची अशी वाट लाविल्यावर बिचाऱ्या नान्याचा नाइलाज झाला. तो ह्मणाला "खाऊ करितां शाळेंत गेल्या वांचून गत्यंतर नाहीं. बरें पण, आपण शाळेंत गेलों, आणि नानांनीं पैसा दिला नाहीं, आणि तेथेंच एखाद्या खोलींत कोंडून ठेविलें, तर मग! नाना असें करणार नाहींत हें उघड आहे. त्यांचें काय गेलें पैसा द्यायला! परभारें आऊचे पैसे, तिला पुराणाला जायचे, फुरसत नाहीं, ह्मणून तिनें नाना पाशीं ठेऊन दिले. मग ते काय ह्मणून मला अटकावून ठेवतील! एवढें कशाला, मी काय शेणा मेणाचा बनलों नाहीं. कोंडण्याचा त्यांचा इरादा दिसला, कीं तेव्हांच पो बारा करीन, मग काय करतील? आलाच प्रसंग तर दांडगाई करण्याला ही मी कमी करणार नाहीं. परवां गण्याचें कसें झालें तें ह्मणावें लक्षांत असूंद्या. पण, आऊ तरी किती वेडी ही; तिनें नाना पाशीं पैसे दिले, ते माझे पाशीं देती तर काय झालें असतें! मग एवढी पंचाईत कशाला हवी होती! आज रात्रीं आऊ आली ह्मणजे तिला विचारतों. आणि सगळे पैसे मी आपल्यापाच

जवळ ठेवतों ह्मणजे झालें. रोज आपला त्यां तला एक एक पैसा वेत गेलें ह्मणजे झालें. पण, आतांची वाट काय कारावें? शाळेंत जाऊन पाहवें काय होतें, तेथें पैसा मिळण्याचा रंग दिसला, तर बरें नाहीं तर सूं. असा विचार करीत, स्वारी शाळेजवळ आली. तों शाळा बंद. तो समोर हलवायाच्या दुकानांत मिठाईकडे पाहत बसला. कांहीं वेळानें, नाना येऊन शाळा उघडली, तों नान्या त्यांच्या जवळ जाऊन पैसा मागूं लागला. त्यांनीं लागलीच पेटी उघडून त्यांतून एक पैसा काढल्या सारखें करून तो नान्यास दिला. (पु. चा.)

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध ९ शके १८१४

## राष्ट्रीय सभा

( यंदाची आठवी बैठक )

दर वर्षीं नुसते ठराव कागदांत नाचवावयाचे असतात पण यंदाची मजल अगदीं निराळी आहे. या बैठकीस सर्व लोक जे ठराव बहुमतानें पसार करितील त्या प्रमाणें पुढें कृति करून दाखवावयाची आहे. सभेचे ठराव निव्वळ सरकारास सूचना असतात तेव्हां राष्ट्रीय सभेनें ठराव पसार केल्या नंतर त्या प्रमाणें वागण्याचें सरकारचें काम असें. परंतु यंदा कांहीं गोष्टी फार निराळ्या स्वरूपाच्या आहेत. येत्या बैठकीस आपण जे ठराव करणार आहों त्या प्रमाणें कृति करून दाखविण्याचें आपल्याच माथीं आहे. कायावाचामनें करून सर्वजण या बैठकीस जी दिशा स्वीकारतील आणि जो कार्यारंभ उभारतील तीच दिशा व कार्यारंभ पुढील आपल्या मनोरथाचा मूळ पाया होणार आहे.

पहिला विचार विलायतच्या बैठकी संबंधानें आहे सन १८९३ साला राष्ट्रीय सभेची बैठक हिंदुस्थानांत न भरविता विलायतेंत भरवावयाची आहे. ईशकृपेनें वांछित सुदिन प्राप्त झाला आहे. लिबरल पक्षाच्या हातीं राज्य सूत्रें आलीं आहेत. जगन्मान्य ग्लाडस्टन साहेब मुख्य प्रधान आहेत, नामदार दादाभाई नवरोजी पार्लमेंटचे सभासद आहेत, लिबरल पक्षाचे पुष्कळ लोक साह्यकर्ते आहेत, ब्रिटिश कमिटी आपलें मुख्य मंत्रिमंडळ आहे, सुरेंद्रनाथ बानरजी आदिकरून अग्रणी लोकांनीं केलेल्या दोन वर्षीं मागील विलायतच्या मोहिमेनें कान्सरव्हेटीव पक्षा कडील लोक ही हळूं हळूं राष्ट्रीय सभेला अनुकूल होत आहेत इत्यादि अनेक अनुकूल साधनांचा समुच्चय आपल्या प्रयत्नाला यश आणण्यास समर्थ आहे. या वेळीं हिंदुस्थानचा जय विलायतेंत झाला तर होण्या सारखा आहे. ही वेळ चुकली तर पुन्हा फिरून अशी वेळ येण्याची आशा नको. तेव्हां असा निर्वाणीचा व बाणीचा डाव येऊन ठेपला आहे. अशा प्रसंगीं सर्व राष्ट्रांनें आपल्या थैल्या खुल्या केल्या पाहिजेत. यथाशक्ति प्रत्येक नेटिव हसणविणाऱ्या इसमानें फूल नाहीं फुलाची पाकळी आपली ह्मणून हजर केली पाहिजे. जर एवढ्या वर्षी हिंदुस्थाना करितां ह्मणजे राष्ट्र प्रीत्यर्थ फंड गोळा करण्याचें प्रयोजन पडूं शकेल तर ही वेळ दुसरी नाहीं. तो हीच होय. विलायतची मोहिम कांहीं सामान्य प्रकरण नाहीं. सहस्त्रावधि रुपये खर्च होतील तेव्हांच आपल्या राष्ट्राचें कल्याण होईल. आयर्लंड सारख्या देशाला स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्यास किती विघ्नें व अडचणी येत आहेत, किती उदाचरित लोक तुरुंगवास भोगीत आहेत, व त्या देशा निमित्त किती कल्होळ गेल्या निवडनिवडींत माजला होता हें लक्षांत आणलें ह्मणजे आपण आरंभलेलें कार्य आपल्या भाषा, धर्म, आचार विचार यांच्या भिन्नपणामुळें किती अवघड व बिकट आहे व विदेशीय राज्यकर्त्यां पासून आपला कार्यभाग साधण्यास आपण किती त्रिविध ताप सोशले पाहिजेत याची कल्पना होईल.

दुसरा विचार ब्रिटिश कानग्रेस विषयीं आहे. ही कमिटी ह्मणजे सर्व राष्ट्राचा उजवा हात होय तेव्हां अशा आवश्यक संस्थेच्या चिरायुपणासाठीं फंड फार मोठा गोळा केला पाहिजे.

तिसरा विचार कायदे कौंसिल आक्टाच्या अमलबजावणीच्या बाबतींत आहे. थोडे दिवसापूर्वीं व्हाइसराय पुण्याच्या मुनसिपालिटीच्या मानपत्रावर उत्तर देतेवेळीं या आक्टा संबंधानें सानुकूल असें बोलले. पण या आक्टा प्रमाणें कायदे कौंसिलांतून लोकप्रतिनिधी निवडण्याच्या सूचना व नियम राष्ट्रीय सभेनें व्हाईसराय साहेबांस कळविले तर त्यांचा स्वीकार होऊन आपला मनोरथ पूर्ण होण्याचा रंग आहे. या शिवाय दरसालचे महत्त्वाचे ठराव विशेष पद्धतवारीनें व वारंवार विवेचनानें राज्यकर्त्यांच्या मनांत बिंबवावयाचे आहेत ही गोष्ट त्या खेरीज आहे. या सालीं सोन्या रुप्याच्या हुंडणावळीच्या भावासंबंधानें एक मोठा प्रश्न सर्व राष्ट्रासमोर आहे आणि त्या शिवाय अंदाज पत्रकाहून ज्यादा खर्च झाल्यामुळें हिंदुस्थानच्या खजिन्यात दीड कोटीची तूट पडण्याचा संभव आहे तेव्हां ही तूट भरविण्याचे उपाय प्रजेला अनर्थमूलक होऊं नयेत ह्मणून आगाऊ योजना राष्ट्रीय सभेला याच बैठकीस करावयाची आहे.

असो. अशा नानाविध कारणामुळें यंदाची बैठक मोठ्या आणिबाणीची आहे. तेव्हां आमचा वऱ्हाडप्रांत या वेळीं आपली कितीं कायम ठेवून देशसेवेला कितपत तत्पर राहतो हें पाहण्याकडे राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक प्रांतस्थ सभासदांचे डोळे लागले आहेत. अद्याप कोठें मोठीशी चळवळ नाहीं तरी सभेची वेळ पाठीशी येऊन ठेपली आहे तेव्हां सर्व प्रांतभर राष्ट्रीय सभे विषयीं जागृतावस्था व कळकळ दृष्टीस पडेल असें आह्मी इच्छितों. उमरावती जिल्ह्यांत अलिकडे कांहीं कांहीं सभा व व्याख्यानें राष्ट्रीय सभेविषयीं चालू असल्याचें कळतें. अकोला जिल्ह्यांतही यथाक्रमानें राष्ट्रीय सभेचीं कामें मोठ्या आस्थेनें चाललीं आहेत.

## फौजदारी न्यायखातें

सन १८९१ चा रिपोर्ट.

सन १८९१ त एकंदर १८७२४ फौजदारी खटले पटावर दाखल झाले त्यापैकीं ज्या खटल्यांत फिर्यादीच्या जाबजबान्या वरून फिर्यादी कम पुराव्याच्या असें माजिस्ट्रेटांस दिसून आलें असे खटले १०९३ होते आणि ते मूळ चौकशीतच रद्द करण्यांत आले. सहा जिल्ह्या पैकीं इलिचपूर जिल्ह्याचे डेपुटी कमिशनर लिहितात कीं त्यांच्या हद्दींत ज्या फिर्यादी आल्या त्यापैकीं शेकडा ६४ फिर्यादी काढून टाकण्यांत आल्या आणि या आंकड्या वरून माजिस्ट्रेटांचा चौकसपणा, व शहानिशा हीं संतोषकारक आहेत. परंतु आफि. जुडिशिअल कमिशनरचें ह्मणणें कीं इलिचपुराकडील माजिस्ट्रेटांतच खऱ्या खोट्या चा निर्णय करण्याची एवढी अद्भुत शक्ति कोठून आली हें कळत नाहीं आणि वास्तविकपणे त्यांच्या मतें पुष्कळ फिर्यादी विनाकारण रद्द झाल्या असाव्यात. ९७८ फौजदारी खटले खोटे ह्मणून काढून टाकले त्यांत फक्त १९च वाशिम जिल्ह्यांत खोटे या सदरा खालीं दाखविले आहेत. वाशिमचे डेपुटी कमिशनराचें ह्मणणें कीं आह्मी बारीक चौकशी केल्या नंतर थोडेच खटले खोटे व बनावट केल्याचें दिसून आलें. परंतु उलटपक्षी इतर जिल्ह्यांतील शेंभरा वरचे आंकडे ताडून पाहतां डेपुटी कमिशनरची ही वृथा फुशारकी असून त्यांचा चौकसपणा नवा इतका कसोशीचा व तोलाचा होता.

बुलढाणे जिल्ह्यांत सार्वजनिक आरोग्य व फारिस्टचा कायदा या संबंधानें १८० फौजदारी खटले निराळे करण्यांत आल्या कारणानें एकंदरीनें १९८ एवढी अपराधांची संख्या वाढली. वाशिम जिल्ह्यांत पोलीस अक्टाच्या ३४ वे कलमा पेक्षां सार्वजनिक स्वच्छते विषयीं पिनल कोडांतील कलमें विशेष उपयोगांत आणिलीं असें दिसतें

मनुष्याचें जीवित आणि मालमत्ता या संबंधानें जे अपराध घडतात त्यांचें प्रमाण उत्तरोत्तर वाढतें आहे. ४० खुनाचे होते त्यांत एका खुनी मोकदम्यांत आकोल्या कडील एका पाटलीणीनें भूमिंत खजिना सांपडावा ह्मणून मनुष्याचा बळी दिला होता. वणी जिल्ह्यांतील कांहीं बायांहेखेरानीं केरोसीन तेलानें उभ्या खेड्यासच आग लाविली होती. आणि वाशिम जिल्ह्यांतील उमरखेड कडे डाकेखोरांच्या टोळीनें हल्ला केला होता परंतु तेथील स्पेशल माजिस्ट्रेट रा. रा. यादवराव आनंदराव, त्यांचे बंधु नारायणराव पाटील, समशेर खान, बापू वाणी व रघुनाथ गोसावी इत्यादि गृहस्थ मोठ्या सावधपणानें, शौर्यानें व जीवावर उदार होऊन डाकेखोरांवर तुटून पडले आणि त्यांनीं कांहीं दंगेखोरांस जायबंद ही केलें. त्यांच्या या मर्दुमकीच्या सत्कृत्याबद्दल जुडिशिअल कामिशनर साहेबांनीं त्यांची फार फार तारीफ केली आहे.

The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 28 1892.

## THE CONSTITUTION OF THE GERMAN ARMY.

There are several misconceptions about the German Army even among the most educated men in our country and we think if we were to devote some space to explain the nature of that military kingdom and not the least advanced in other accomplishments for it we shall greatly gratify the curiosity of our readers.

As the theory of the existing system stands every German subject is liable to military service from the end of his seventeenth to the completion of his forty fifth year. He is supposed to serve for a time in the field army, for a time in the Landwehr, and for a time in the Landsturm a reserve force for home defence. In practice military duty for a German begins at the beginning of the year in which he completes his twentieth year. He may have to serve for three years in the colors but may be drafted to the Landwehr at the end of two. Naturally enough the financial considerations greatly modify these conditions. The expenditure of the army would far exceed the revenue of the nation if every one liable to service were really enrolled. Various contrivances are devised to keep the numbers within manageable limits. Young men of education who can afford to equip themselves are allowed to serve with some privileges for one year only, and are then drafted into the reserve. Then a special body exists called the Ersatz reserve, consisting of men who are never passed through the ranks; part of the residium in fact that remains from the whole body of available recruits after the required number of men have been taken for service with the colours. The Ersatz reserve in supposed to go through periodical trainings, but economy in practice curtails these a good deal. The system can not work well and must inevitably provoke a great deal of jealousy. A great number of men are given compulsory long leaves at the end of their second year of service, being held to be for the following year available for reall to their regiments if required. These Dispositions—Urlanber, as they are called have become so numerous as to be 50 percent of the line infantry. In theory the men thus dismissed should be the best who require no more training; but practice once more differing from theory induces officers to keep their good men as a backbone for new recruits; so heart burning and jealousy are naturally excited in connection with the compulsory leave grants. The new arrangements however which have been now proposed will amongst many other effects get rid of the Ersatz reserve and Dispositions—Urlanber system.

Hitherto the whole lists of men liable for service having been drawn out, exemptions are first granted in the case of persons having certain admitted claims. The only survivor and supporter of a destitute family is exempt; the son of a farmer whose services are indispensable; students in certain professions, and so on. The list of such indisputable claims is very liberal. There can be little doubt that it fosters the military spirt without endangering the other branches essential to the well-being of a progressive nation. Even after such exemptions the number of recruits liable to service is too great and the list is reduced to the required proportions by drawing lots. The high numbers go to the Ersatz reserve' or are simply let off altogether and carried to a residuary list, which can be drawn upon the following year if necessary. Some

idea of the real military resources of Germany so much greater than those actually called upon may be gathered from the figures of any particular year. In 1890 the total number of men available was 6,17,071. of these 1,82,836 were taken for the colours: 85,363 were assigned to the Ersatz reserve; and 12,666 became one year's volunteers. Under the new system the number of men actually passing through the ranks will be largely increased, and the second line of defence or the first reserve will also be considerably expanded. The time of service is to be reduced to two years for all men alike, thus no compulsory leave system will prevail. Merely to keep up the existing establishments the recruits taken in the first instance must naturally be more numerous than hitherto. For the infantry 25 percent more will be required and for the other arms 20 percent more. Some considerable advance upon these figures must be made as the great purpose of the contemplated changes is to increase the strength of the army. Though the annual contingent may increase from the figures we have quoted above it will be plain that the additional recruits will be secured the service altogether.

We have generally been accustomed to think of German Military Service as strictly universal, but the actual fact falls far short of that ideal. There are moreover other considerations of weightier moment in the shape of money which place immence difficulty in her way of augmenting her Military force. Hampered by free trade restrictions, menaced by a wronged and neighbouring enemy with an elasticity of mind and resources wonderful, already overpressed by heavy taxation to maintain her growing military kingdom, her effort to increase her army is entirely for the purpose of self-defence, rather than any thing else.

## NOTICE

To
The General Traffic Manager
G. I. P. Railway Company
Bombay

Sir,

My clients Shriram Shankarlal and Co. of Malkapur have desired me to acknowledge the receipt of the Company's notice No 612 of the 14th instant through the agency of the Station-Master at Malkapur and to reply to it as follows:—

The Jawari, the subject-matter of the notice, was first of all consigned by my clients from Malkapur to the firm of Murlidhar Liladhar of Nachangao at Pulgao. The goods were delvired as usual to the consignee who for reasons best known to them reconsigned them to Malkapur to the address of my clients My clients are given to understand that the goods were attached by the Police at Malkapur under instructions of the Magistrate having jurisdiction at the Station while they were yet under the control of the Great Indian Peninsula Railway Company.

My clients' Gumasta was subsequently proscuted for having sold the Jawari knowing it to be noxious but he was ulimately acquitted. It is true the Magistrate ordered the Station-Master at Malkapur to make over the Jawari to my clients but I am sorry to inform you that my clients refuse to take delivery of the same. The notice says that the charges of locomotion of the Jawari will be recovered from my clients but I donot see how it can be done. The Jawari does not now belong to my clients and they do not advance any kind of claim to it. If a person consigns any goods the consignee is not bound to receive them. If I am not mistaken the duty of the Company in such a case would be to recover any charges that may have become payable on them from the consignor and not from the consignee who is not at all responsible to the Company as there exists no contractual relation between him and the Company.

My clients were not bound to give all these particulars and also to address this reply to you. It would simply have sufficed them to refuse the delivery of the goods and repudiate the Company's right to recover any charges on them But my clients have preferred the present course as they think that the Station-Master of Malkapur have acted through ignorance of Law. This being the case you should be apprised of the circúmstances in order that you may be able to remedy the matter before it is too late and so to avoid the bother and trouble of a fruitless Civil litigation.

I may also say that it is not the business of my clients to discuss the correctness or otherwise of the Magistrate's order under which the Station-Master has apparently acted. But it is for the Company to see whether they can launch themselves into civil litigation.

I beg to remain
Sir
Your most obedient servant
V. K. DESAI
Pleader for Shriram Shankarlal and Company
of Malkapur.
Dated, Akola the 27th
of November 1892

## वऱ्हाड

हवामानः—अलिकडे थंडीचें मान बरेंच उतरलें आहे. आतां थंडी कडक पडून मळाभ्रें न आलीं तर रब्बीचीं पिकें चांगलीं येतील. रोगराई विशेष ह्मणण्या सारखी नाहीं.

आम्हास लिहिण्यास दुःख वाटतें कीं येथील स्माल्लकाज कोडताचे नाझर रा. रा. वामन गंगाधर हे दम्याच्या आजारानें गेल्या सोमवारीं सायंकाळीं मरण पावले. यांच्या जागीं तूर्त काम करण्यास त्याच आफिसांतील ३५ चे कारकून रा. रा. तुकाराम वामन यांस नेमलें आहे. कायमच्या नेमणूकी साठीं पुष्कळ उमेदवार आहेत आणि त्यांच्या हक्कांचा योग्य विचार मे. डेपुटी कमिशनर साहेब करितील असें आम्ही इच्छितो.

मि आर. आबर्ड सिव्हिल आणि सेशन जज्ज यांनीं आपले कामाचा चार्ज घेऊन पुन्हः मि. निकोलेट यांस परत दिला आणि त पुढे स्पेशल ड्युटीवर हैदराबादेस गेले वऱ्हाडासाठीं जें निराळे रेव्हेन्यु कोड करण्याचें पुष्कळ दिवसां पासून घटत आहे तेंच काम पुरें करण्या करितां साहेब मजकुर जात आहेत असें समजतें.

बाशिमकर 'करुणेश प्रसादिक' मंडळीनें गेल्या सोमवारीं येथील राजेश्वरा प्रीत्यर्थ 'रामराज्य वियोग' चा खेळ करून दाखविला आणि निम्में उत्पन्न देवालयास अर्पण केलें. हें सत्कृत्य मंडळीस भूषणास्पद असून लोकांनीं ही त्यांचे आभार मानले. हल्लींचीं नाटकपात्रें आपलीं कामें चांगलीं करितात आणि त्यांत रा. रा. गोपाळराव दाते उर्फ सुमेरसिंगाची भूमिका इतें चांगली भर पाडली आहे. या मंडळीनें आपले खेळ ही आतां चांगले तयार केले आहेत तेव्हां त्यास चांगला लोकाश्रय मिळो असें आम्ही इच्छितों.

मलकापूर येथें जी "विद्याभिवृद्धि मंडळी" स्थापित झाली आहे तिनें चालू साला करितां ८ व्या व ९ व्या ईयत्ता बद्दल १०० रुपये अगाऊ भरले. जीं मुलें अगाऊ फी देण्या जोगीं होतीं त्यांज पासून फक्त २१ रु. घेऊन ज्यांस अगाऊ देण्याची शक्ति नाहीं त्याजपासून दरमहा दोन रुपये फी घेण्याचें ठरविलें आहे. हा फीचा दर हायस्कूलपेक्षां फक्त ८ आण्यांनीं अधीक आहे. परंतु बाहेरगांवच्या गरीब मुलां करितां हा दर कमी करण्याचा अगर विशेष प्रसंगीं मुळींच फी माफ करण्याचा कमिटीचा विचार आहे. हें कमिटीचें कृत्य फार स्तुत्य आहे. ज्या गृहस्थांस आपलीं मुलें मलकापुरास शिकण्या करितां ठेवण्याची सोय करितां येईल त्यांस या मंडळीच्या वरील व्यवस्थेच्या योगानें आणि येथील ९ व्या इयत्तेच्या यंदाच्या उत्तम निकालाच्या योगानें आतां फार उमेद येईल असें वाटतें. यंदा मलकापुराहून ९ व्या ईयत्तेच्या परीक्षेस ६ मुलें आलीं होतीं तीं सर्व पास झालीं.

येथील एका फुलमाळी जातीच्या विठू नांवाच्या सोळा सतरा वर्षांच्या मुलानें त्याच जातीच्या बारा वर्षां खालील मुलीशीं जबरी संभोग केला ह्मणून त्या मुलीची फिर्याद दाखल झाल्याचें कळतें.

दुःखकारक गोष्ट कीं रा० रा० रघुनाथ वामन देशभानकर बी. ए. असि. मास्तर, आकोला हायस्कूल यांच्या पत्नी प्रसूतीच्या वेळीं मूल आडवें आल्यामुळें मरण पावल्या. राजश्री रघुनाथराव यांच्या संसाराचा बिघाड झाला आणि लहानमुलें उघडीं पडलीं पण ईश्वरी नेमानेमा पुढें इलाज नाहीं.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं, रा. रा. केशव ब्रह्मगिरी पाळेकर डे. ए. इन्स्पेक्टर इलिचपूर हे क्षयाच्या आजारामुळें रजेवर होते त्यांस नाशिक मुक्कामीं गेल्या आठवड्यांत देवाज्ञा झाली. गृहस्थ मोठे प्रामाणिक व सुस्वभावाचे होते.

## जाहिरात.

सर्व लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं मामूमशाफिका नजीकचे अनीकट पासून वराल अनीकटच्यावर मुनिसिपल हद्द आहे. तेथपर्यंत नदींत कपडे धुणें, स्नान करणें, जनावरांस पाणी पाजणें व खरकटीं भांडीं घांसणें, तसेंच बंदुका फोडून पाण्यांतील मासे मारणें व इतर रितीनें पाणी मैला करणें, इतक्या गोष्टी करण्यास मनाई आहे सदरहू मनाई बरसात सुरू होऊन अनीकटचे तक्त निघे पर्यंत केली आहे. त्याच प्रमाणें नदीचे दोन किनाऱ्यानें मुनसिपल हद्दींत मैला करण्याची सक्त मनाई आहे. वरील ठरावा प्रमाणें जो वागणार नाहीं त्याजवर मुनसिपल कायद्याचे कलम १३८ प्रमाणें मुकदमा केला जाईल कळावें. ता० २४-११-९२ इ०

B. M. Sathe.
Secretary A. M. C.

## नोटीस

सिद्धश्री मुरलीधर लिलाधर दुकान नाचणगांव यांसः—

श्रीराम शंकरलाल दुकान मलकापूर यांचा जयगोपाळ उपरी. तुह्मी आपला गुमास्ता जोगीदास याचे मार्फत आमचे पासून मलकापूर मुक्कामीं ३३ पोतें जवारी खरेदी केली व तीं तुमचे मनुष्यानें पुलगांवास रवाना केली होती. त्या संबंधानें आपण चांगलाच तूल मानऊन दिला आहे. वर्धा येथील मे. डेपुटी कमिशनर साहेब यांचे कडेस आपण खोटा नाटा जबाब देऊन सर्व घोंगडें आमचे गळ्यांत घालण्याचा आपण यत्न केला होता परंतु श्रीबालाजी कृपेंकरून त्यांतून आह्मी पार पडलों. आपण असें करण्याचें नव्हतें. असो आपली मर्जी! हल्लीं आपल्यास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मे. माजिस्ट्रेट वर्ग पहिला, मलकापूर यांनीं हा जवारी आह्मास देण्याविषयीं हुकूम स्टेशन मास्तर मलकापूर यांस दिला आहे. व त्या प्रमाणें त्यांनीं आह्मास नोटीस ही दिली परंतु ती आह्मी घेण्यास इनकार केला. सदरहु जवारी आपली आहे आमचा कांहीं संबंध नाहीं. आपल्यास जरूर असल्यास सदर्हू जवारी रेलवेचा जो पैसा देणें असेल तो देऊन आपले ताब्यांत घेण्याचा तजवीज करावी. आपण जवारी खरेदी केली त्या कमात आह्मी आपल्यास कोणत्याही प्रकारें फसविलें नाहीं. आपले मनुष्यानें पाहून जवारी घेतली व आपल्या हुकुमा प्रमाणेच त्यांनीं व आह्मी वर्तन केलें आहे ह्मणून या संबंधानें आपलें नुकसान झालें ह्मणून आमचे वर दावा कराल तर विनाकारण खर्चांत बुडाल. इतक्यावर तुह्मास जसें वाटेल तसें करावें. सदर्हु जवारी नेण्याची तजवीज न कराल व आपलें नुकसान होईल तर आह्मी जबाबदार नाहीं. या जवारी संबंधानें आह्मांला विनाकारण फौजदारी प्रकरणांत रुपये अतिशय खर्च झाला तेही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत या नोटिशीचे खर्चासुद्धां अणून देऊन पावती घेऊन जावें. असें न केल्यास रितीप्रमाणें तजवीज केली जाईल कळावें. तारीख २७ माहे नोवेम्बर सन १८९२ इसवी.

( सही )
श्रीराम शंकरलाल मा० इंद्रसिंग
तर्फे मु० गोविंद पंढरीनाथ
दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार.

रशियांत एकानें एक घड्याळ केलें आहे त्याचें तोंड मनुष्याच्या तोंडाबरखें केलेलें असून किती वाजले हे दरखेपेला सांगितले जातात.

सुमात्रा देशांत सोन्याच्या बारीक सांखळ्या करून त्याचे पोषाख तेथील बायका करतात असें समजतें.

पुढच्या वर्षी इंडिया नांवाच्या पत्राची किंमत दुप्पट होणार व हें प्रतिमासी निघत जाईल असें ठरविण्यांत आलें आहे.

सु० प०

निझाम हैदराबादच्या अबु घेतल्याच्या घाणेरड्या फिर्यादीचें काम आरोपि मित्र हा एकाएकीं आजारी झाल्यामुळें बंद होतें तें ता. १८ रोजीं पुन्हा सुरू झालें. मित्र यास एकाएकीं वांती जुलाब होऊं लागल्यावरून त्यास कोणी कांहीं विषप्रयोग केला अशी गप होती, पण तपासांत तसें कांहीं नाहीं असें ठरलें. तो बरा झाला म्हणजे खटला चालूं होण्याचें ठरून त्याकरतां मुंबईचे बारिस्टर मि. इनवीरारिटी निघूनही गेले पण वर सांगिल्या प्रमाणें आरोपी मित्र चांगला हुशार झाल्यावाचूनच खटल्याची सुरवात झाली. त्यास कोडतांत आणून बसविला होता. त्या दिवशीं जें कोडतांत काम झालें त्यांतही बरीच गंमत बाहेर आली. प्रथम डेक्कन हेरल्ड पत्रांतील या कज्याबद्दलचा मजकूर वाईट आहे असें न्यायाधिशानें सांगितलें नंतर फिर्यादी मेदीहसन ही हैदराबाद सोडून चालते होणार असल्यामुळें त्यास कोर्टांत हजर करावा असें ठरून त्यास हजर केला व हा कज्या आपसांत मिटून मला आज येथून जातां येईल तर बरें असें त्याच्याच तोंडून काढलें. माझ्या बायकोच्या वर्तनाचा संबंधानें सरकारांतून कांहीं तपास चालल्याचें मला माहीत नाहीं असें जे फिर्यादीनें मागें सांगितलें तें खोटें पाडण्याकरतां सरकारी कागद कज्यांत दाखल केले आणि त्यावरून फिर्यादीनें खोटी जबानी दिली असें दाखविण्याचा यत्न झाला! आणखी काय मासले होतात पाहाणें आहे.

अलीपूरच्या एका हिंदूनें आपला अज्ञान मुलगा देवीस अर्पण करण्याचें योजिलें म्हणून त्यास जन्मठेप झाली.

गेल्या महर्गतेमुळें होल्करसरकारानें गेल्या सालचा हलबनी कर रयतेस माफ केला स्वराज्य.

मुरगांव येथें असलेल्या क. यानकच्या राशीयन फौजेवर एक हजार चिनी फौजेनें हल्ला करून हाकून लावलें.

कोहात तोफखान्यांपैकीं दोन तोफा व २० गोलंदाज यांस ४०० पायदळासह लुशाई प्रांतावर निघून जाण्याचा हुकूम झाला आहे असें सांगतात.

एका नवीन तऱ्हेचें विमान तयार करणारास २०,००० रुपये इनाम देण्याचें जर्मन सरकारानें ठरविलें आहे. हें चार मजली असून ९६ फूट मोठें असावें व त्यांत २९३० मेटर ग्यास ठेवण्याची सोय असावी असें फर्माविलें आहे आपल्या प्रजेस असल्या प्रकारच्या मार्गास लावण्याचा हाच एक उत्तम उपाय आहे आणि तो स्वदेशी राजा असल्यावाचून होणें कठीण आहे.

ठा० अ०

गव्हांचें उत्पन्न— सन १८९१ सालीं सगळ्या हिंदुस्थनांत २६५००००० एकर जमिनींत गव्हाची पेरीं होती. त्या पासून ६८४२००० टन गहूं उत्पन्न झालें. ह्या पैकीं १३९७४६६ टन म्हणजे $\frac{१}{५}$ गहू बाह्य देशीं रवाना झालें.

९२ लक्ष रुपये तोटा— ह्या सालीं हिंदुस्थानांतील एकंदर आगगाड्यांच्या उत्पन्नांत ९२ लक्ष रुपयां पेक्षां जास्त तोटा आहे ह्या मुळें हिंदुस्थान सरकारास फार काळजी लागली आहे.

गाड्यांच्या नमुन्या बद्दल बक्षीस— हिंदुस्थानांतील लष्कराचें सामान नेण्या आणण्या करितां खेचरांच्या गाड्या आहेत. ह्या गाड्या हलक्या, मजबूद, आणि थोड्या खर्चांत करण्याचे नमुने तयार करून ते स्टेट सेक्रेटरींनीं जी एक कमेटी नेमली आहे तीस दाखविण्या करितां पाठवावे तिनें जे पसंत केल्यास पांच बक्षिस देण्याचा जाहीरनामा स्टेट सेक्रेटरींनीं लाविला आहे. सर्वांत मोठें ७५० पौंडाचें, व सर्वांत धाकटें १५० पौंडाचें आहे नमुने पसंत झाल्यावर निम्मे बक्षीस, पुढें कांहीं मुदत गेल्यावर बाकीचें बक्षीस देण्याचा ठराव आहे.

बडेलम्र—हैद्राबादचे तरुण निजाम यांची एक बहीण आहे तिचा विवाह एक बडे सरदार खुर्शुदुल मुल्क नावांचे आहेत त्यांच्या बरोबर करण्याचें ठरलें असून हा विवाह ह्याच महिन्यांत हैद्राबाद येथें झाला. या संबंधानें एकंदर तयारी चांगली होती.

रशिया सरकारची ठेव— इंग्लंडांत १०००००० पौंड, जर्मन देशांत ८२००००० मार्कस ( एक नाणे ) आणि फ्रांन्स देशांत १९,५०,००,००९ फ्रांक्स (एक नाणें) मिळून एकंदर १०५०००००० रुबलची ठेव बाह्य देशीं आहे तरी रशियांस भिकारी म्हणतातच.

शु० सू०

होळकर महाराजांस नुकताच एक मुलगा झाला आहे व त्याचें नांव तुकोजीराव असें ठेवलें आहे. मुलगा झाल्याच्या या आनंदाबद्दल होळकरांनीं शेतकऱ्यांवर तुंबलेली बाकीची बरीच मोठी रकम त्यांस सूट दिली आणि रावसा. बी. ए. गुप्ते यांस सरकारचें काम चांगलें केल्या बद्दल ३०० रुपयांचे पोषाक दिला व त्यांस बढती देवून पोलीस कमिशनरच्या जागीं नेमलें. तसेंच शेतकऱ्यास आणखीही कांहीं सूट देण्याचा महाराजांचा इरादा असून त्याबद्दल तपशीलवार रपोट करण्या करतां त्यांणी एक कमिशन नेमलें आहे या कमिशनांत दिवाण मि. बेदरकर असून मेसर्स नकचंद, गुप्ते, व घागळे हें आहेत.

सातारच्या तुरुंगांत फाशीची शिक्षा झालेला एक महार आज कित्येक महिनें पडून आहे. खून केल्याची शाबिती झाल्यावरून तेथील सेशन कोर्टांत त्यास फाशीची शिक्षा झाली. रीतीप्रमाणें हायकोर्टाची मंजुरी आल्यावर त्यांस फाशी देण्याची तारीख नेमली. ही तारीख नेमल्यावर कैदीनें मुंबई सरकाराकडे अपील केलें, तेव्हां अर्थात फाशी देणे लांबणीवर पडलें. पुढें मुंबईसरकारनें अपील रद्द करून पाठविलें तेव्हां फाशीची तारीख पुन्हा नेमली. अर्थात कैदीनेंही गव्हरनरजनरलांकडे अपील केलें. तेव्हां पुन्हा फाशी देणें तहकूब राहिलें. पुढें फाशी माफ करण्यांत येत नाहीं असें गव्हरनर जनरल यांजकडूनही लिहून आल्यावर पुन्हा फाशीची तारीख नेमली! कैदीही भक्कम असल्यामुळें त्यानें आतां विलायतच्या राणीकडे अपील केलें आहे हें अपील पोटांतून जाऊन तारेनें जरी व आला तरी महिना दोन महिनें लागणार आणि तिकडूनही नकाराच पाडा आल्यास कैदीचा गुरू कैदीस प्रीव्ही कौंसलाकडे अपील करण्यास सांगणार कीं काय व त्या नंतर पार्लमेन्टाकडे जाण्यास सांगणार कीं काय हें पहाणेंच आहे.

इंडिया पुस्तकाचे कर्ते आज पर्यंत डिगबी होते, पण आतां मि. स्टीफन्स झाले.

ठा० अ०


## जाहिरात हे पाक पाहा

हा हेमंत ऋतु युक्त हिवांतच खाण्यानें पौष्टीक शक्ती व स्फूर्ती व स्मरणशक्ती मिळेल व हस्तपाद व कटी ठणक व शूळ व सर्व वात विकार नाहींसे खात्रीनें होतात व बाळंतीनीस व सर्वी स्त्रीयांस गुण देणारें सौभाग्य सुंठ हे पाक विक्रीस तयार आहेत लागेल त्यांनीं मागविल्यास व्ह्याल्युपेबलनें पाठऊ. पोष्टेज खर्च निराळा पडेल त्वरकरा गेली वेळ येणार नाहीं.

| | |
|---|---|
| सालम मिसरी पाक द० शे० ८० तो. | ३रु. |
| बदाम पाक | २॥ |
| गोखरू पाक | ७ |
| कुस्मांड पाक | ५ |
| सालम मिसरी व बदाम पाक प्रत २ | २ रु. |
| सौभाग्य सूंठ | २ |

( पत्ता व सही ) शिवचरणगीर रामगीर
वैद्य कुरणखेडकर अकोला गंगावरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.

## जाहिरात

कां फसतां? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. म्हणजे आम्ही व्ह्याल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ०८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचें व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ धातुयिक ज्वर म्हणजे चवथारें हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १०५ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ०१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे वडेवे वटसी बाधा व नदुर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर २ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।=

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शूळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम रानस तकलीफ अगदीं न सून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जल्द गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज ह्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धशिशी याजवर दर डबीस किं. १०=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारल्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जल्द गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस किं. १०–

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ॥ हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. हीं २ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द म्हणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फूल वडस रातांधळें लाली खुपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस किं. १०६

ह्या शिवाय पोष्टेज निराळा पडेल.

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेशा मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर
वैद्य कुरणखेडकर अकोला गंगावरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.


☞ हें पत्र आकोलें येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.